संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६

## मोठ्या घोषणा

- राष्ट्रीय हातमाग धोरण कारागिरांना प्रोत्साहन आणि समर्थन प्रदान करेल. शैक्षणिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य शक्य होईल. मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन केले जातील.
- महात्मा गांधी ग्राम स्वराज - खादीला प्रोत्साहन देण्यासाठी - उत्पादन, प्रशिक्षण आणि विपणनासाठी असेल.
- एक जिल्हा, एक उत्पादन याला प्रोत्साहन दिले जाईल.
- क्रीडा - उपकरणे डिझाइन आणि उत्पादन करण्याची योजना आहे.
- औद्योगिक समूह - पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे.
- एमएसएमईसाठी - सूक्ष्म उद्योगांना मदत करण्यासाठी स्वावलंबी भारत निधी तयार केला जाईल.
- सरकारी संस्थांना अल्पकालीन मॉड्यूलर अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टियर २ आणि ३ स्तरांपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल.
- मालवाहतुकीसाठी मालवाहतूक कॉरिडॉर बांधले जातील
- ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि ३ शहरांच्या विकासासाठी ₹११.२ लाख कोटींचे वाटप करण्यात आले आहे. २०२६-२७ मध्ये ही रक्कम १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली जाईल.
- खासगी विकासकांसाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी तयार करण्यात आला आहे. सरकार अंशतः हमी देईल.
- मालवाहतुकीसाठी एक समर्पित फ्रेट कॉरिडॉर बांधला जाईल. पूर्वेकडील दानकुनी ते पश्चिमेकडील सुरत या बंदराला जोडण्याची योजना देखील आहे.
- वाराणसी आणि पटना विकसित करून अंतर्गत जलमार्ग विकसित केले जातील.
- ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.
- देशातील सीप्लेन उत्पादकांना पाठिंबा दिला जाईल.
- मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई आणि सिलिगुडी ते वाराणसी यासह सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.
- विकसित भारतासाठी उच्चस्तरीय बँकिंग समिती स्थापन केली जाईल.

**मुंबई (दै. संध्या)**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करदात्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. १ एप्रिल २०२६ पासून देशात नवीन 'इन्कम टॅक्स ॲक्ट २०२५' लागू होणार असून, याद्वारे कर प्रणाली अधिक सुलभ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात आयटीआर भरण्यासाठी अंतिम मुदत सांगितली आहे. करदात्यांना मोठा दिलासा देत सरकारने रिवाइज्ड रिटर्न भरण्याची मुदत वाढवली आहे. जर तुमच्याकडून टॅक्स रिटर्न भरताना काही चूक झाली असेल, तर ती सुधारण्यासाठी आता संबंधित वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत वेळ मिळेल. मात्र, मूळ रिटर्न भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै (पगारदार लोकांसाठी) हीच कायम असेल. नॉन-ऑडिट बिझनेस आणि ट्रस्टसाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत असेल. उत्पन्नाची चुकीची माहिती देणे किंवा करचोरी करणे आता महाग पडणार आहे. जर एखाद्या करदात्याने जाणूनबुजून चुकीची माहिती दिल्यास आता थकीत कराच्या १०० टक्के दंड भरावा लागेल. प्रामाणिक करदात्यांना प्रोत्साहन आणि करचोरांना चाप लावण्यासाठी हा कडक नियम करण्यात आला आहे. परदेशात फिरायला जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. परदेशी टूर पॅकेजवर आकारला जाणारा टीसीएस जो पूर्वी ५ टक्के ते २० टक्के होता, तो आता थेट २ टक्के करण्यात आला आहे. यामुळे परदेश प्रवास स्वस्त होणार असून पर्यटकांवरील कराचा बोजा कमी होईल. ज्या लहान करदात्यांनी आपली परदेशातील मालमत्ता पूर्वी जाहीर केली नसेल, त्यांच्यासाठी ६ महिन्यांची विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. या काळात करदाता आपली मालमत्ता स्वतःहून जाहीर करू शकतो, जेणेकरून भविष्यातील कडक कारवाई टाळता येईल. जर एखादा अनिवासी भारतीय भारतात आपली स्थावर मालमत्ता विकत असेल, तर आता विक्रीच्या वेळीच टीडीएस कापला जाईल. अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले की, नवीन कर नियमांमुळे कर प्रणाली सोपी होईल आणि सर्वसामान्यांचा गोंधळ कमी होईल. १ एप्रिलपासून लागू होणारे नवीन नियम आणि फॉर्म्स अशा प्रकारे तयार केले आहेत की, नागरिक स्वतःहून कोणतीही अडचण न येता कर भरू शकतील.

महत्वाचे म्हणजे, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी 'लखपती दीदी' योजना सुरू करण्यात आली होती. ही योजना यावेळीही पुढे सुरू ठेवत, नवी 'शी-मार्ट' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महिला वर्गाला आपला व्यवसाय स्थिर करण्यासाठी मोठी मदत मिळेल. याशिवाय त्यांना व्यवसायासाठी कमी व्याजदराने कर्जही मिळेल.

यासंदर्भात बोलताना अर्थमंत्री म्हणाल्या, "शी-मार्ट योजनेमुळे महिलांना लघु आणि मध्यम व्यवसाय सुरू करण्यासाठी अथवा आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी कमी व्याजदराने कर्ज मिळेल. याचा फायदा प्रामुख्याने ग्रामीण आणि शहरी भागांतील महिला उद्योजकांना होईल, ज्या भांडवलाच्या कमतरतेमुळे आपला व्यवसाय वाढवू शकल्या नाहीत. सरकारच्या मते, महिलांचा आर्थिक सहभाग वाढल्याने केवळ कुटुंबाचेच उत्पन्न वाढणार नाही, तर देशाची अर्थव्यवस्थाही बळकट होईल. याशिवाय, शी-मार्ट योजना ही स्वयंसहाय्यता गट अथवा बचतगट अथवा स्टार्टअपमध्ये सहभागी महिला आणि सूक्ष्म उद्योग चालवणाऱ्या महिलांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल, असे म्हटले जात आहे.



### काय स्वस्त

कॅन्सरची औषधं, मधुमेहाची औषधं, कपडे, चामड्याची बूटं, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, ईव्ही बॅटरी, सौर पॅनेल, सीएनजी, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनवलेले कपडे, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, ईव्ही लिथियम बॅटरी, वैद्यकीय उपकरणे, लिथियम आयन बॅटरी, अपघात विमा

### काय महाग

इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, खनिज, दारु, पीव्हीसी फ्लेक्स शीट्स



# जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनण्याचा संकल्प

**प्यारे दोस्तो...** बिड्या स्वस्त, दारु महाग!

**सेन्सेक्स आणि निफ्टीत महाभूकंप,** १६ लाख कोटी बुडाले

## विकसित भारताकडे दमदार पाऊल : देवेंद्र फडणवीस



### महाराष्ट्रासाठी काय?

- महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : 378.38 कोटी
- महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस प्रकल्प : 167.28 कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : 283.77 कोटी
- महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : 385.78 कोटी
- उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : 207.10 कोटी
- शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : 646.24 कोटी
- मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : 313.65 कोटी
- जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : 240.90 कोटी
- मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : 6103 कोटी
- मुंबई मेट्रो : 1702 कोटी
- एमयुटीपी 3 : 462 कोटी
- एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : 155.32 कोटी
- समृद्धी महामार्गावर आयटीएस : 680.79 कोटी
- पुणे मेट्रो : 517.74 कोटी

(ही केवळ मुंबई, पुण्यातील प्राथमिक आकडेवारी आहे. एकूण : 12,355 कोटी)

**मुंबई (दै. संध्या) :** पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा 98,306 कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, 12,355 कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे 1 लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात 12 लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ 1 लाख कोटी असायची. 5 लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाचा एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी 5000 कोटी प्रत्येकी 5 वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडली असताना भारताने आपला विकास दर कायम ठेवला आहे. आर्थिक विकास, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे आणि सबका साथ सबका विकास या तीन कर्तव्यांभोवती हा अर्थसंकल्प बांधण्यात आलेला आहे. त्यात वर्तमानाचे भान आहे आणि भविष्याची जाण आहे. आजच्या केंद्रीय अर्थसंकल्पामुळे मुंबई आणि महाराष्ट्राला मोठा फायदा होणार आहे. गेल्या वर्षी मुंबईत मनोरंजन आणि करमणूक उद्योगाशी संबंधित जागतिक दर्जाची वेव्हज परिषद झाली होती. मुंबई हे या उद्योगाचे बलस्थान आहे हे ओळखून याठिकाणी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी उभारण्याची केलेली घोषणा महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकरण असून टायर टू आणि टायर थ्री शहरांच्या क्षमतांचा विचार करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला वेग देण्याची केलेली घोषणा ही या शहरांचे आर्थिक बळ वाढवणारी ठरेल. पाच लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांमध्ये पायाभूत सुविधा वाढविणे आणि पायाभूत सुविधा फंडाची स्थापना करून बारा लाख कोटी निधी शहर विकासासाठी ठेवणे यामुळे शहरांचे रूप बदलून जाईल. महापालिकांच्या बॉड्ससाठी प्रत्येकी 100 कोटी सवलतीच्या रूपात देण्याची केलेली गोष्ट देखील राज्यातल्या महानगरपालिकांना बळकट करणारी आहे.

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**



"आम्हाला खूप कमी तपशील मिळाले. आम्ही अखिल भारतीय आयुर्वेद संस्थानाची वाट पाहत होतो. ते कुठे आहे? आम्हाला ते केरळमध्ये हवे होते. आमच्याकडे आयुर्वेदाची खूप जुनी परंपरा आहे. पण आम्ही केरळचं नाव ऐकलं नाही. आम्ही मच्छीमार आणि नारळ ही नावं ऐकली - ते केरळ असू शकतं. पण जेव्हा त्यांनी जहाज दुरुस्तीबद्दल बोलले तेव्हा त्यांनी वाराणसी आणि पाटणा यांचा उल्लेख केला पण केरळचा उल्लेख केला नाही. हे थोडं आश्चर्यकारक आहे. कदाचित बजेट दस्तऐवजात अधिक तपशील असतील. मी ते अजून वाचलेले नाही. भाषणात खूप कमी तपशील होते."

**- शशी थरुर**



हा तरुणांसाठी रोजगार देणारा अर्थसंकल्प नाही. उत्पादन क्षेत्र घसरत आहे. गुंतवणूकदार भांडवल काढून घेत आहेत. घरगुती बचतीत मोठी घट होत आहे. सुधारणेस वाव नसणारा अर्थसंकल्प आणि भारताच्या खऱ्या समस्यांपासून पूर्णपणे अनभिज्ञ असलेले बजेट.

**- विरोधी पक्षनेते राहुल गांधी**

## संपादकीय

# आई-वडिलांच्या मालकीच्या घरावर, मुलांचा हक्क असतो का?

सर, मी आई-वडिलांबरोबर राहतो, त्यांची देखभाल करतो, धाकटा भाऊ दुसरीकडे राहतो, त्यामुळे आमच्या सोसायटीचा पुनर्विकास झाल्यावर जो नवीन फ्लॅट मिळेल तो आई-वडिलांनी मलाच द्यायला हवा...'- असे संवाद वकिलांच्या ऑफिसमध्ये बरेचदा ऐकू येतात.

कोर्टात सहसा लोकांचे मुखवटे दूर होतात आणि खरे चेहरे समोर येतात. अशावेळी प्रॉपर्टी असली तरी त्रास, नसली तरी त्रास अशा परस्पर विरोधी घटना घडतात. 'वंध्यत्वं तु समीचीनं कुपुत्रो दुखदायका' म्हणजे 'एकवेळ संतती नसली तरी चालेल, पण कुपुत्र (कुपुत्री) अत्यंत दुःख देणारा ठरतो' अशा आशयाचे वचन श्री भागवत महापुराणात आहे. असे वाद जर 'आई-वडील विरुद्ध मुलं' किंवा सख्ख्या भावंडांमध्ये असतील आणि प्रॉपर्टीत हिस्सा मिळावा म्हणून मुलं जर आई-वडिलांचा छळ करत असतील तर त्याला वेगळे स्वरूप प्राप्त होतं. आई-वडील आणि मुले एकत्र राहतात, हे "आपले" घर आहे असे मुलं मानतात तोपर्यंत ठीक असतं. आपलेपणा जाऊन "मी-माझं" जेव्हा सुरु होतं, तेव्हा मात्र खटके उडतात. असे वाद रक्ताच्या नात्यातील लोकांशी होतात, तेव्हा संताप आणि मानसिक क्लेश या दोन्ही भावना दाटून येतात. अनेकांनी असा अनुभव घेतला असेल, त्यामुळे 'आई-वडिलांच्या मालकीच्या घरावर, त्यांच्या हयातीत मुलांचा हक्क असतो का', असा प्रश्न अनेकवेळा उच्च न्यायालयापुढे उपस्थित झाला आणि त्यावरील निकाल नेहमी आई-वडिलांच्या बाजूने लागला. जुना फ्लॅट आई-वडिलांनी त्यांच्या तरुणपणात कष्टाने घेतलेला असतो. ३०-४० वर्षांनंतर, मुलं कर्ती असताना बिल्डिंग रिडेव्हलपमेंटला जाते तेव्हा आई-वडील थकलेले असतात. मग मुला-मुलींमध्येच 'नवीन फ्लॅट कोणी घ्यायचा' यावरून वाद सुरू होतात. प्रत्येकाला आपलीच बाजू बरोबर वाटते. आई-वडिलांच्या हयातीत आई-वडिलांच्या स्वकष्टार्जित मिळकतींमध्ये मुलाबाळांना कोणताही मालकी हक्क-अधिकार नसतो. या विषयावर आतापर्यंत आपल्या मुंबई उच्च न्यायालयाबरोबरच इतरही अनेक उच्च न्यायालयांचे निकाल आहेत. "आई-वडिलांच्या स्वकष्टार्जित घरात राहण्याचा हक्क मुलांना प्राप्त होत नाही, तर तो हक्क आई-वडिलांच्या मर्जीवरच अवलंबून असतो. एकमेकांचे संबंध चांगले असताना राहण्याची परवानगी दिली याचा अर्थ आयुष्यभर आई-वडिलांनी हा बोजा घेऊन राहावे असा होत नाही, त्यामुळे आई-वडिलांना जागेचा ताबा मागण्याचा पूर्ण अधिकार आहे" या शब्दांत दिल्ली उच्च न्यायालयाने कानपिचक्या दिल्या आहेत. या केसमध्ये आई-वडिलांनीच स्वतःच्या मुलाविरुद्ध दावा दाखल केला होता. याच पार्श्वभूमीवर "एकतर पालकांच्या स्वकष्टार्जित मिळकतीमध्ये मुलांना पालकांच्या हयातीत कुठलाही हक्क मिळत नाही. त्यामुळे वेळ पडल्यास मुलांना घराबाहेर काढण्याचा हक्क पालकांना आहे", असा निकाल न्या. जी. एस. पटेल आणि माधव जामदार यांच्या खंडपीठाने दिला आहे. तात्पर्य हेच, जो फ्लॅट-आईवडिलांचा स्वकष्टार्जित असतो त्याचे विभाजन कसे करायचे किंवा कायद्याच्या भाषेत त्याची "विल्हेवाट" कशी लावायची हा सर्वस्वी त्यांचा अधिकार असल्यामुळे मुलांची इच्छा काय आहे हे कायद्याच्या दृष्टीने गौण आहे. आई-वडिलांनी हे निर्णय भावनिक न होता घ्यावेत. भविष्यात दुर्दैवाने जर वाद मिटले नाहीत आणि पुनर्विकास प्रक्रियेमध्ये अडसर ठरू लागले, तर मग अशावेळी इतर सभासदांच्या रोषाला सामोरे तर जावे लागतेच आणि कोर्टातसुध्दा दिलासा मिळणे अवघड असते. अर्थात, सगळ्यांना एकाच तराजूत तोलणे चुकीचे आहे. टाळी एका हाताने वाजत नाही. कोणीतरी "संवाद" सुरु करणं गरजेचं असतं, नाहीतर बरेचदा प्रश्न तसाच राहतो.



## संस्कृत सुभाषित

अभ्यावहति कल्याणं विविधं वाक् सुभाषिता
सैव दुर्भाषिता राजन्ननर्थायोपद्यते ।।
(उद्योगपर्व, अध्याय ३४, ७७ महाभारत)
अर्थ : वाणीने चांगले भाषण केले असता त्यापासून अनेक प्रकारे कल्याण होते परंतु दुर्भाषण केले असता तीच वाणी अनर्थाला कारण होते.

## आगामी साप्ताहिकी


२ फेब्रुवारी २०२६ सोमवार
गुरुप्रतिपदा
गाणगापूर यात्रा
खंडोबा महाराज यात्रा – मऱ्हळ खु।। (सिन्नर)
विष्णुबुवा जोग महाराज पुण्यतिथी – आळंदी देवाचा

३ फेब्रुवारी २०२६ मंगळवार
तुळसमापता पुण्यतिथी – घाटलाडकी (अचलपूर)

४ फेब्रुवारी २०२६ बुधवार
शब्बे बारात
संत नरहरी सोनार पुण्यतिथी

५ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
गोदड महाराज पुण्यतिथी – कर्जत (अहिलयानगर)
अंगारक संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०९.४४

## उपदेशकथा



### भक्ती

एका राजाच्या दरबारी अनेक कलावंत होते. त्यात एक नृत्यांगना होती. प्रत्येक कलावंताने दरबारात आपली कला राजापुढे प्रगट केली. अखेर त्या नृत्यांगनेने अनेक प्रकारचे नृत्य करून आपले नृत्य थांबवले. राजा अतिशय प्रसन्न झाला. त्याने तिला प्रश्न केला, 'बाई, ही एवढी कला तुझ्या शरीरात कोठून येते? आपल्या सर्व अवयवांना तू कसे खेळवतेस?' नृत्यांगनेने उत्तर दिले, 'राजा, मी काय सांगू?' मी एवढेच जाणते की, तत्त्वचिंतकाचा आत्मा त्याच्या मस्तकात वास करतो. कवीचा आत्मा त्याच्या हृदयात राहतो. गायकाचा आत्मा त्याच्या कंठात असतो. पण नर्तिकेचा आत्मा तिच्या अवघ्या शरीराला व्यापून राहिलेला असतो.' भक्ती ही सर्वांगानी करावयाची असते. भक्ताचा ईश्वराच्या ठिकाणी असलेला भाव त्याच्या जीवनाला आतबाहेर व्यापून राहतो. तिन्ही अवस्थांमध्ये त्याला दुसरा ध्यास असत नाही.

कथा उपदेश : आपले उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर त्यावर सारे लक्ष केंद्रित करावयाचे असते.

## पंचांग

| | |
|---|---|
| २ फेब्रुवारी २०२५ | करण:बालव १४:४१:५२ |
| सोमवार | करण:कौलव |
| विक्रम संवत्– २०८२ | २५:५२:३४+ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:सिंह२२:४७:२६ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४५ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – १३ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:प्रतिपदा | गुरुप्रतिपदा |
| २५:५२:३४+ | गाणगापूर यात्रा |
| नक्षत्र:ओषा २२:४७:२६ | खंडोबा महाराज यात्रा |
| योग:आयुष्मान | – मऱ्हळ खु।। (सिन्नर) |
| ०७:२०:०८ | विष्णुबुवा जोग महाराज |
| योग:सौभाग्य | पुण्यतिथी – आळंदी |
| २८:४५:११+ | देवाचा |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 2 | | | | | | 5 |
| 5 | | 4 | 7 | | | 6 | 3 | |
| | | 1 | | 9 | | | | 8 |
| | | | 3 | | | | | |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| | | | | | 9 | | | |
| 3 | | | | 1 | | 8 | | |
| | 5 | 9 | | | 6 | 7 | | 2 |
| 1 | | | | | | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 6 | 5 | 8 | 4 | 7 | 9 | 3 |
| 8 | 5 | 4 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 1 |
| 7 | 3 | 9 | 1 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 3 | 4 | 5 | 9 | 1 | 7 | 6 | 8 | 2 |
| 1 | 9 | 8 | 4 | 6 | 2 | 3 | 7 | 5 |
| 6 | 2 | 7 | 3 | 5 | 8 | 9 | 1 | 4 |
| 5 | 8 | 2 | 6 | 7 | 3 | 1 | 4 | 9 |
| 4 | 7 | 3 | 8 | 9 | 1 | 5 | 2 | 6 |
| 9 | 6 | 1 | 2 | 4 | 5 | 8 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ९६२ – पोप जॉन बाराव्याने सुमारे ४० वर्षे रिक्त असलेल्या पवित्र रोमन सम्राट पदावर ऑट्टो पहिल्याला बसवले.
- १०३२ – पवित्र रोमन सम्राट कॉन्राड दुसरा बरगंडीचाही राजा झाला.
- ११९ – कॅलिक्सटस दुसरा पोप पदी.
- १५०९ – तुर्कस्तान व पोर्तुगालमध्ये दीवची लढाई.
- १५३६ – स्पेनच्या पेद्रो दि मेंदोझाने आर्जेन्टिनात बॉयनोस एर्स वसवले.
- १५४२ – इथियोपियात पोर्तुगालच्या सैन्याने बासेन्तेचा गड जिंकला.

### राष्ट्रीय

- १९८६ – दलाई लामा पॉप जॉन दुसरा यांना भारतात भेटले.
- २००७ – काश्मीरमध्ये बस खड्ड्यात कोसळून १२ प्रवाशी ठार.

### जन्म

- १६४९ – पोप बेनेडिक्ट तेरावा यांचा जन्म.
- १८६१ – ओट्टोमन इम्पायरचे शेवटचे सुल्तान मेहमेद पाचवा वहीदोद्दीन यांचा जन्म.
- १९२८ – इटलीचे पंतप्रधान लुईजी सीरीअको डी मीता यांचा जन्म.

### निधन

- १२५० – एरिक अकरावा, स्वीडनचा राजा यांचे निधन.
- १४६१ – ओवेन ट्युडोर, इंग्लंडच्या ट्युडोर वंशाचा राजा यांचे निधन.
- १७६९ – पोप क्लेमेंट तेरावा यांचे निधन.
- १९७० – बट्रान्ड रसेल, ब्रिटीश गणितज्ञ व तत्त्वज्ञानी यांचे निधन.
- १९८७ – ऍलिस्टेर मॅकलेन, स्कॉटिश लेखक यांचे निधन.

## : SMS :

Koi Diwani Apko Hr Tarf Dhund Rhi He, Apke Vzud ko Bekrari Se Puch Rhi He, Khuda Apko Slamat rkhe, Suna He Mayawatiji Apne Liye Dulha Dhund Rhi He..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.५ | १८.३ |
| अहमदनगर | २७.४ | १८.२ |
| अकोला | ३०.१ | १८.७ |
| अमरावती | २८.९ | १७.४ |
| बीड | ३०.१ | १९.२ |
| भंडारा | २९ | १६.३ |
| बुलढाणा | १८.९ | ८.१ |
| चंद्रपूर | ३०.५ | १९.२ |
| चेन्नई | ३० | २१.६ |
| नवी दिल्ली | १८.७ | ७.८ |
| धुळे | ३०.४ | २०.८ |
| गोंदिया | २८.४ | १७.४ |
| जळगाव | २९.५ | १८.३ |
| कोल्हापूर | २८.३ | १६.८ |
| लातूर | २८.८ | १८.१ |
| मुंबई | ३०.३ | २४.३ |
| नागपूर | २८.३ | १६.८ |
| नांदेड | २९.२ | १८.९ |
| नंदूरबार | २८.९ | २० |
| नाशिक | २८.४ | १८.१ |
| पुणे | २७.४ | १४.९ |
| पंढरपूर | २९ | १७.९ |
| सातारा | २८.५ | १२ |
| सांगली | २९.१ | १६.६ |
| सोलापूर | २९.२ | १९.४ |
| वर्धा | २९.८ | १६.९ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम वादांना टाळण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थिती चिंताजनक राहिल.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा.

**मिथुन :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारिक जबाबदारी, देणे:घेणे सीमित ठेवा. सुखद प्रवासाचे योग येतील.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम मुलांकडून थोडा त्रास होईल, परंतू प्रयत्न केल्यास समस्या सुटू शकते.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व व्यापार, व्यवसाय चांगला राहील. महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत.

**तुळ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम कामाचे फळ आता मिळेल. जोडीदाराशी संबंधात प्रगाढता येईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता.


**धनु :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर आत्मविश्वास वाढीस लागेल. कामात तसेच व्यवसायात मनासारखे यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण प्रतिष्ठा वाढेल. स्वतःच्या विवेकाने निर्णय घेऊन कामे केल्यास यश मिळू शकेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४८



### आडवे शब्द

१. केस काळे करण्यासाठी वापरले जाणारे लाल फूल
३. कौशल्य
५. खळबळजनक
९. बैलाचा सण
१०. सुंदर तरुणी
११. नगाऱ्याचा आवाज
१२. दमणूक
१४. हवेतील थंडावा
१६. कौशल्य
१८. सोने
२०. कानाजवळचा भाग
२२. एक मुस्लिम सण (महिना)
२४. लपविणे
२५. युद्ध
२७. पाठवणी
२९. भरवसा, भिस्त
३०. पादत्राण
३१. '.. जय किसान'
३३. बारा वर्षाचा काळ
३५. संगीत,सप्तसूर
३६. कालवा (हिंदी)
३७. अडत्या
४०. लोकमानस
४२. चांदी
४३. लिंबूपाणी
४४. थोर, मोठा
४५. संगोपन करणारा
४६. कडू पण आरोग्यदायी भाजी
४९. बाजार
५०. आच्छादन
५१. बारीक, मऊ केस
५२. धोबी
५३. मध्यप्रदेशातील प्रांत
५५. पार्वती
५६. संकट
५७. भारतीय चलन
५९. ओरखडा
६१. आई
६२. पाणकोंबडा
६३. च्या शिवाय
६५. तंबूची कापडी भिंत
६६. महेश भूपतीची पत्नी असलेली 'मिस इंडिया'
६८. दालचिनी
७०. संस्कृत रामायणाचे हिंदी रुपांतर करणारे संत
७२. बरोबर आलेला फौजफाटा
७४. पृथ्वी
७५. दात
७६. पोर, बाळ
७६अ. आवर भराभर!
७७. शेवट
७८. परत
७९. राजपत्नी
८०. आश्रय
८१. हळूवार, नाजूकपणे

### उभे शब्द

१. हातचलाखी करणारा
२. दार, कवाड
३. गव्हाचे पीठ
४. लहान मुलांची गाणी
५. ठोकून काढणे, मारणे
६. नमस्कार
७. स्वामी
८. टीका करणारा
९. पायाच्या नळीचा मांसल भाग
१३. अरण्य
१५. रम्य
१७. निवासस्थान
१९. सकस
२१. श्रीरामाचे तीन बंधु
२३. पालखी, मेणा
२६. कंटाळा, अनुत्साह
२८. काळ्या तोंडाचे माकड
२९. चर्चा
३१. नावाचा जयघोष
३२. जन्म (हिंदी)
३४. पालव
३८. कलंक लावणारा
३९. कोळशाची पूड
४१. वात्रट
४३. संपूर्ण
४४. आदिमाया, पार्वती
४५. अपमान
४७. मातीचा कण
४८. बाळ, पोर
५४. लायब्ररीला मराठी शब्द
५६. मोफतच्या विरुद्ध
५८. सतेज, तेजस्वी
६०. रात्रीचा पाऊस
६१. विपुलता, रेलचेल
६२. साखरेची फुगीर वडी
६३. भांडण, वैर
६४. घोड्याच्या पायाखाली लावण्याची लोखंडी पट्टी
६७. प्रत्येक वर्षी
६९. लपवणे, दाबून टाकणे
७१. अंगरखा
७३. दरवेशाचा चेला
७६अ. अजगर
७७. गाडीचे छत

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.अंथरुण पांघरुण ६.दम ८.नस ९.लालबहादूरशास्त्री १२.कालवाकालव १५.लटपटीत १६.रवा १७.लटलटणे १९.कपबशी २२.दवाखाना २५.टका २७.तरुण २९.टोक ३०.रोप ३१.डगर ३२.सापळा ३४.विकट ३५.चपापणे ३६.हजर ३८.उनाड ३९.पाळत ४०.परवा ४१.चावट ४३.तळतळाट ४५.नीज ४७.चाकरमानी ५२.कर्ण ५४.मसलत ५५.लक ५७.सदन ५९.मद ६०.धमक ६२.चमचम ६५.नार ६६.बत्तासा ६८.कनक ६९.बापजादे ७१.गळका ७२.क्षमायाचक ७४.अंबर ७५.भाळ ७६.सुसर ७७.वरात ७९.तिनात ८१.भार ८२.तारक ८३.डामरट ८४.दर

उभे उत्तर : १.अंध:कार २.रुसवा ३.धनवट ४.रूस ५.कलप ६.दर ७.मशाल ९.लाटणे १०.बटीक ११.हात पसरणे १३.लवाद १४.ललना १५.लटका १८.लटपट २०.शीतलहर २१.जाणकार २३.वाटोळा २४.खाक २६.सडपातळ २८.खिसा ३०.रोकड ३१अ.गप ३३.परवचा ३४.विना ३५.चळत ३७.जवानी ४०.पटकन ४२.टकमक ४४.तपास ४६.जलद ४८.रस ४९.मालमत्ता ५०.नीत ५१.पालम ५३.साधना ५६.कचकच ५८.दया ६१.मरगळ ६३.मनकवडा ६४.उपरती ६६.बकासुर ६७.साक्षरता ६९.बाबा ७०.देशांतर ७३.याचक ७४.अंतर ७५.भाक ७८.राम ८०.नाद

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुख्य सचिवांनी घेतला नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रण कार्यालयाचा आढावा

■ नव्या नोंदणी भवनाची केली पाहणी

पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी शनिवारी सकाळी 10 ते दुपारी 12:30 या वेळेत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रण कार्यालयाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी कार्यालयाच्या प्रशासकीय, तांत्रिक तसेच नागरिक सेवा विषयक विविध बाबींची माहिती त्यांनी घेतली. या आढावा बैठकीदरम्यान नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा, दस्तऐवज नोंदणीची प्रक्रिया, संगणकीकरण, ऑनलाईन सुविधा तसेच तक्रार निवारण यंत्रणा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा राबविण्याच्या दृष्टीने मुख्य सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यानंतर मुख्य सचिवांनी नव्या प्रशासकीय इमारतीच्या शेजारी उभारण्यात येत असलेल्या नोंदणी भवनाची पाहणी केली. या इमारतीच्या बांधकामाची सद्यस्थिती, उपलब्ध होणाऱ्या सुविधा, कार्यालयीन जागेचे नियोजन, नागरिकांसाठी प्रतिक्षालय, पार्किंग व्यवस्था तसेच आधुनिक पायाभूत सुविधांबाबत त्यांनी माहिती घेतली. बांधकामाचे काम नियोजित कालमर्यादेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या आढावा बैठकीस राज्याचे जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, सह नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक राजेंद्र मुठे यांच्यासह नोंदणी व मुद्रांक नियंत्रण कार्यालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान विभागाच्या कामकाजातील अडचणी, भविष्यातील गरजा तसेच सुधारणा योजनांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

### महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनला अजित पवार यांचे नाव देण्याची राज्य शासनाकडे मागणी

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील बालेवाडी-म्हाळुंगे येथे शिवछत्रपती क्रीडा नगरीत उभारण्यात येत असलेल्या नियोजित महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनला महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे दिवंगत अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांचे नाव देऊन क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची स्मृति कायम राखावी अशी मागणी पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेचे अध्यक्ष ॲडव्होकेट अभय छाजेड यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे पत्राद्वारे केली. तसेच देशात मॅरेथॉन क्रीडा संस्कृतीची पायाभरणी करणाऱ्या भारतीय ऑलिंपिक महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी यांची स्मृती जतन करण्यासाठी पुण्यात दरवर्षी होणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन यापुढे कै. सुरेश कलमाडी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा म्हणून ओळखली जाईल असे पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे विश्वस्त म्हणून ॲडव्होकेट अभय छाजेड यांनी जाहीर केले. पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेतर्फे पुण्यातील सणस मैदान येथे सबज्युनिअर क्रीडा स्पर्धांना आज प्रारंभ झाला त्यावेळी उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपस्थित सर्व खेळाडू, पंच व क्रीडा रसिकांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून अजित पवार व सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली वाहिली.

### आयांश, नौरलने तीन विजेतेपदांसह गाजवला शेवटचा दिवस

पुणे (दैनिक संध्या) : पाषाण येथील लोयोला हायस्कूल ॲथलेटिक ट्रॅकवर सुरू असलेल्या रियुनियन ॲथलेटिक्स स्पर्धा (टीएआर सी-७६) आंतरशालेय ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी आयांश ढोले (लोयोला), नौरल आलम (हचिंग्ज), सुरभी उंबरकर (एमईएस बालशिक्षण मंदिर) आणि संघातील सहकारी अर्वा स्वामी आणि दिशा कोरडे यांनी (हचिंग्ज कॅम्प) सर्वोत्तम कामगिरी केली. दिवसभरातील १३ स्पर्धापैकी सात रिले शर्यतीत सेंट व्हिन्सेंटच्या मुलांनी दोन स्पर्धा जिंकल्या तर एमईएस बालशिक्षणने मुलींच्या विभागात तीन विजेतेपदे पटकावली. १२ वर्षांखालील मुलांच्या लांब उडीमध्ये आयांश ढोलेने (लोयोला) ४.४८ मीटर अंतर गाठून तिसरे विजेतेपद पटकावले. त्यानंतर १४ वर्षांखालील मुले विभागात नौरल आलमने (हचिंग्ज) १:०१.७० सेकंदात ४०० मीटर धावणे जिंकून तिसऱ्या जेतेपदावर नाव कोरले. मुलींच्या विभागात सुरभी उंबरकरने (एमईएस बाल शिक्षण मंदिर) १२ वर्षांखालील मुलींच्या लांब उडीमध्ये ३.७२ मीटर उडी मारून अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर, अर्वा स्वामीने (एमईएस बाल शिक्षण मंदिर) १४ वर्षांखालील मुलींच्या ४०० मीटर धावण्यात १:१०.०८ सेकंद वेळ नोंदवून अव्वल स्थान पटकावले. १७ वर्षांखालील मुलींच्या विभागात दिशा कोरडे (हचिंग्ज कॅम्प) ने ८.६२ मीटर उडी मारून जेतेपदाची संख्या तीनवर नेली.

# नारायण ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’चे उद्घाटन

## भारताची टॉप-रँकिंग शैक्षणिक प्रणाली आता पुण्यात : प्रमिला पी.

पुणे (दै. संध्या) :

आशियातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या नारायण ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या वतीने पुण्यात ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ (सीओ) सुरु करण्यात आले आहे. सेव्हन लव्ह्ज चौक, स्वारगेट पुणे येथे उभारलेल्या या केंद्राचे उद्‌घाटन रविवारी झाले. या केंद्रामुळे पुणे व परिसरातील विद्यार्थ्यांना देशपातळीवरील टॉप रँक घडवणारी नारायणची सिद्ध शैक्षणिक प्रणाली उपलब्ध होणार आहे.



नारायण ग्रुपच्या पॅन-इंडिया अकॅडमिक हेड प्रमीला पी. यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्रसंगी महाराष्ट्र अकॅडमिक हेड जयसिम्हा रेड्डी, मुंबई 'सीओ'चे प्राचार्य भूषण जमसंडेकर, अंधेरी 'सीओ'चे अकॅडमिक डीन सिद्धेश नाईक, उपाध्यक्ष राकेश यादव, मार्केटिंग हेड सुमित चतुर्वेदी, उपमहाव्यवस्थापक सतीश देसरी, पुणे 'सीओ'चे प्रमुख मधुकर रेड्डी आणि शाखा व्यवस्थापक ऋषिकेश जाधवर आदी उपस्थित होते.

माध्यमांशी बोलताना प्रमिला पी. यांनी सांगितले की, पुणे केंद्रामध्येही नारायणची संशोधनाधिष्ठित अध्यापन पद्धत, शिस्तबद्ध अभ्यासक्रम आणि सातत्यपूर्ण कामगिरी मूल्यांकन प्रणाली राबवली जाणार आहे. पुण्यातील विद्यार्थ्यांना आता देशातील टॉपर्स घडवणारी तीच संरचित शिक्षणपद्धती उपलब्ध होईल. महाराष्ट्रातील विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च क्रमांक मिळवू शकतील, असे पोषक शैक्षणिक वातावरण निर्माण उपलब्ध करून दिले जाणार आहे."

जेईई ॲडव्हान्स्ड २०२५ मध्ये नारायणच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत टॉप १० मधील पाच ऑल इंडिया ओपन कॅटेगरी क्रमांक (३, ४, ६, ७ आणि १०) पटकावले आहेत. यामध्ये पार्थ मंदार वर्तक (एआयआर ४) आणि साहिल देव (एआयआर ७) यांनी महाराष्ट्र टॉपरचा मान मिळवला असून, दोघांचेही प्रशिक्षण नारायणच्या मुंबई केंद्रात झाले आहे.

स्वारगेट येथील या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये जेईई व नीट परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधाही उपलब्ध आहेत. ४६ वर्षांची परंपरा असलेल्या नारायण ग्रुपकडे देशभरात ९००हून अधिक शैक्षणिक संस्था असून, ५० हजारांहून अधिक शिक्षक आणि सहा लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी या व्यवस्थेचा भाग आहेत, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## बिल गेट्सच्या माजी सल्लागाराने व्यक्त केलेला तिरस्कार

पुणे (दै. संध्या) :

शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या एपस्टिन फाइल्सच्या आणखी एका आवृत्तीत बदनाम आर्थिक सल्लागार एपस्टीन आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनचे माजी सल्लागार बोरिस निकोलिक यांच्यातील ईमेल चॅटिंग समोर आले आहे. जेफ्री एपस्टीनला २०१२ मध्ये पाठवलेल्या ईमेलमध्ये, निकोलिक यांनी भारताविषयी विशेषतः पुणे शहराबद्दल आपला तिरस्कार वारंवार व्यक्त केला होता. अमेरिकेच्या न्याय विभागाने शुक्रवारी जेफ्री एपस्टीन फाइल्सचा आतापर्यंतचा सर्वात मोठा संच प्रसिद्ध केला. या प्रचंड संचामध्ये ३० लाखांहून अधिक पानांची कागदपत्रे आणि हजारो छायाचित्रे आहेत. शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या फाइल्समध्ये बोरिस निकोलिक आणि जेफ्री एपस्टाईन यांच्यातील पत्रव्यवहाराचा समावेश होता. एपस्टीन हा लैंगिक गुन्हेगार म्हणून दोषी ठरले होते आणि २०१९ मध्ये तुरुंगात असताना त्यांनी आत्महत्या केली होती. हे ईमेल २०१२ मध्ये निकोलिक भारतात प्रवास करत असताना पाठवले गेले होते. निकोलिक, ज्यांना न्यूयॉर्क टाइम्सने एकेकाळी बिल गेट्स यांच्या निकटवर्तीयांपैकी एक म्हणून वर्णन केले होते, त्यांनी पुण्याला 'अत्यंत घाणेरडे' म्हटले आणि सांगितले की त्यांनी दोन दिवस हॉटेलमधून बाहेर पडण्यास नकार दिला होता. "माझी आवडती जागा नाही. तुम्हाला तर या जागेचा खूप तिरस्कार वाटेल," असे निकोलिक यांनी १ जून २०१२ च्या ईमेलमध्ये एपस्टीन याला पुण्याबद्दल सांगितले. "अगदी जगाच्या टोकावर - पुणे, भारत." त्यानंतर सांगितले की, ते पुढील २० तास प्रवास करणार आहेत, न्यूयॉर्कला पोहोचतील आणि भारत व चीनचा त्यांचा दौरा "खूप व्यस्त" होता, असे सांगून त्यांनी आपल्या शांततेबद्दल माफी मागितली.

## सुषमा चोरडिया यांना 'नाट्यशारदा मंदाश्री स्त्रीशक्ती पुरस्कार' प्रदान

पुणे (दै. संध्या) :

शिक्षण, साहित्य, कला आणि समाजसेवा या चारही क्षेत्रांत अतुलनीय योगदान देणाऱ्या सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा सुषमा संजय चोरडिया यांना 'नाट्यशारदा मंदाश्री स्त्रीशक्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तितिक्षा इंटरनॅशनलच्या वतीने नुकतेच तितिक्षा कलासाहित्य (रौप्य महोत्सवी) संमेलन आणि दशकपूर्ती सोहळा नुकताच आयोजिला होता. त्यामध्ये हा प्रतिष्ठेचा सन्मान देऊन चोरडिया यांचा गौरव करण्यात आला. समाजाप्रती असलेले त्यांचे अमूल्य योगदान आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्य विचारात घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

पद्मश्री उदय देशपांडे व पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते झाले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महामंडलेश्वर



कृष्णदेवगिरी महाराज, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, गायक नंदेश उमप, प्रिया दामले, चंद्रकांत कुलकर्णी (साहित्य व कला विभाग), अमित सिंह (संपादक, न्यायाधिकरण), पोलीस उपयुक्त गणेश जोशी, बाळ पुजारे, क्षमा वैद्य, सुजित दातार, योगेश सुपेकर आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

"शिक्षण, साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा प्रकाश पसरवणाऱ्या सुषमा चोरडिया म्हणजे एक 'बहुआयामी' व्यक्तिमत्त्व आहे. केवळ विचारांनीच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीनेही त्यांनी समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांना मिळालेला हा बहुमान त्यांच्या आजवरच्या निस्पृह सेवेची आणि धडपडीची पोचपावतीच आहे," अशा शब्दांत मान्यवरांनी कौतुक केले.

"कार्यक्षम आणि आदर्शवादी नेतृत्वाचा सन्मान करून त्यांच्या सामाजिक प्रभावाला व्यापक व्यासपीठ मिळवून देणे, हे 'तितिक्षा'चे मुख्य ध्येय आहे. सुषमा चोरडिया यांनी साहित्य आणि कलेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा जपलेला वारसा प्रेरणादायी आहे. त्या केवळ प्रशासकीय जबाबदारीच सांभाळत नाहीत, तर शैक्षणिक क्रांतीत त्या अग्रभागी आहेत. त्यांचे कार्य समाजाला सकारात्मक ऊर्जा देणारे आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या आजवरच्या निस्पृह सेवेचा, कष्टांचा आणि त्यांच्या ध्येयवादी नेतृत्वाचा झालेला यथोचित गौरव आहे," असे प्रास्ताविकात नमूद करण्यात आले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या सोबतीने सुषमा चोरडिया यांनी 'सूर्यदत्त'च्या माध्यमातून शिक्षणाचा परीघ तयार केला असून, 'दर्जेदार शिक्षण' आणि 'सामाजिक जाणीव' यांचा संगम घातला आहे. समाजातील वंचित आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शिक्षणाची दारे खऱ्या अर्थाने खुली केली आहेत. मूल्याधिष्ठित पिढी घडवतानाच समाजाला नवी दिशा देण्याचे मोठे कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज आकाराला येत आहे. शिक्षणासह महिला सक्षमीकरणासाठी सूर्यदत्त विमेन एंटरप्रेन्युअर्स अँड लीडर्स असोसिएशनच्या (स्वेला) अध्यक्षा म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

## ब्रह्मोत्सवात ३०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती

■ श्री महालक्ष्मी मंदिराच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजन

पुणे (दै. संध्या) :

श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ब्रह्मोत्सवाच्या पहिल्या दिवशी पुण्यातील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली. ब्रम्होत्सवाच्या निमित्ताने मंदिरावर फुलांची आकर्षक आरास व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

यावेळी नगरसेवक श्रीनाथ भिमाले, मनिषा चोरबेले, ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड.प्रताप परदेशी, प्रविण चोरबेले, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा आदी उपस्थित होते. उत्सवाचा प्रारंभ मंदिरात




गरुड स्थापना, कलश स्थापना व यज्ञ स्थापना करुन झाला.

शिष्यवृत्ती उपक्रमांतर्गत पुण्यातील हुजूरपागा मुलींची शाळा, रेणुका स्वरूप मुलींची शाळा, विद्या विकास विद्यालय प्रशाला, न्यू इंग्लिश स्कूल टिळक रस्ता, मॉडर्न हायस्कूल, अहिल्यादेवी मुलींची शाळा, विमलाबाई गरवारे हायस्कूल या शाळांमधील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

श्रीनाथ भिमाले म्हणाले, तुम्ही मनातून ठरवले, तर अनेक गोष्टी साकार करू शकता; मात्र त्या साकार करण्याची जिद्द मनात असली पाहिजे. ज्याच्याकडे कला असते, ती लपत नाही; परंतु त्या कलेला योग्य दिशा मिळाली, तर ती आणखी फुलते. होतकरू व गुणवंत मुलांना आर्थिक अडचणी येऊ नयेत, यासाठी महालक्ष्मी मंदिर पुढाकार घेत आहे. आजचे तरुण हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत आणि या भविष्याला योग्य मार्गदर्शन करण्याचे काम महालक्ष्मी मंदिरसारखी संस्था करत आहे, असेही त्यांनी सांगितले.

मनिषा चोरबेले म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी नेहमी स्वप्ने पाहावीत; मात्र ती स्वप्ने साकार करण्याची जिद्दही मनात बाळगली पाहिजे. जिद्द आणि मेहनत करण्याची क्षमता तुमच्यात असेल, तर सारसबाग महालक्ष्मी ट्रस्टसारख्या संस्था नक्कीच तुम्हाला मदत करतील. आजच्या काळात स्वप्ने पाहण्यासाठी पैसे नव्हे, तर कष्ट, मेहनत आणि जिद्द आवश्यक आहेत; ही गुणवैशिष्ट्ये बाळगली, तर स्वप्ने नक्कीच साकार होतील, असेही त्यांनी सांगितले.

अमिता अग्रवाल म्हणाल्या, अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीला सामोरे जात शिक्षण घेत असतात. आजची पिढी ही उद्याचे भविष्य आहे. हे राष्ट्राचे भविष्य चांगले घडावे म्हणून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळण्यात कोणती अडचण येऊ नये म्हणून ट्रस्टच्या वतीने धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत विविध समाज उपयोगी उपक्रम देखील राबविले जातात. तुम्ही कितीही मोठे झालात तरी शाळेबद्दल नेहमी मनात आदर ठेवा कारण इथूनच तुम्ही घडता, असेही त्यांनी सांगितले

रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता १०८ कलश अभिषेक होईल. त्यानंतर रात्री ८ वाजता श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती, श्री महाकाली व श्री विष्णू या उत्सवमूर्तींची धान्य तुला होणार असून आदिवासी भागांत हे धान्य देण्यात येणार आहे. रात्री ८.३० वाजता सुवर्ण कमल आणि रजत कमल अर्चना म्हणजेच उत्सवमूर्तींना सोन्याची व चांदीची फुले अर्पण करण्यात येतील.

उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता केशर दूध अभिषेक, सायंकाळी ७ वाजता पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. देवीच्या उत्सवमूर्तींची पालखी प्रदक्षिणा मंदिर परिसरात होणार आहे. तर, सायंकाळी ७.३० वाजता पुष्पउत्सव म्हणजेच फुलांची होळी होणार आहे. सर्व कार्यक्रमांमध्ये पुणेकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची देशाला एलर्जी का : राजकुमार पडघान

पुणे (दै. संध्या) :

भारत देशांवर इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.भारत देश गुलामीत होता.या इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी भारत देशातील अनेक थोरांना तुरुंगवास, जन्म ठेप व प्राणास मुकावे लागले. त्यावेळेस कुठे भारताला १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले.देशात चहूकडे आनंदोत्सव होण्यास सुरुवात झाली.आनंदोत्सव साजरे तर झालेच.पण तत्कालीन राज्यकर्ते, मान्यवर मंडळींना चिंता होती.ती भारत देशाचा कारभार कसा करावा.सर्वांसमोर मोठा प्रश्न आ करून उभा होता.वेगवेगळे विचार मंथन सुरू झाले.पण प्रश्न सुटेना.तत्कालीन राज्यकर्ते मान्यवर यांच्या बैठका झाल्या.आणि देशाची घटना करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली.सदस्यांच्या नियुक्त्या केल्या गेल्या.आणि घटना समितीचे अध्यक्ष म्हणून तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांची निवड झाली.तर मसूदा समितीचे



अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निवड बहूमताने झाली.समितीमध्ये अनेकांची वर्णी लागली. घटना समितीच्या बैठकाही होण्यास सुरुवात झाली. बैठकीला सर्व सदस्यांनी उपस्थित राहणे अगत्याचे असतांनाही समिती सदस्य अनुपस्थित राहत होते.परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर हे घटना मसुदा समितीचे अध्यक्ष असल्याने घटना बनविण्याची संपूर्ण जबाबदारी ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचेवर येवून पडली.कारण घटना समितीचे काही सदस्य हे आपआपल्या कामात व्यस्त, तर काही विदेशी गेलेले,काहीचे निधन झाले.पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे ब्रीदवाक्य होते मी प्रथम भारतीय व अंतीमही भारतीय हे ब्रीदवाक्य समोर ठेवून दिवस रात्र सखोल अभ्यास करून २ वर्षे ११ महीने १८ दिवसांत देशांचे संविधान लिहून देशातील सर्व समाजाला समान हक्क प्रदान करणारे समता, स्वातंत्र्य, बंधुता,व न्याय देणारे संविधान की, ज्या संविधानाने स्री-पुरुष समानता आणून गरीब व श्रीमंतांना मतदानाचा एक अधिकार देवून देशाचा राजा बनविणारे तथागत गौतम बुद्धांनी दिलेल्या पंचशील तत्वांवर आधारित संविधान दिले. तरीही मनु विचारसरणीच्या लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर हे केवळ बौद्ध समाजाचे असल्याने देशातील मनुवादी विचाराने प्रेरीत असलेल्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एलर्जी आजही दिसून येते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान पूर्ण करून संविधानाची प्रत तत्कालीन राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद,पंतप्रधान पंडित जवाहरलाल, वल्लभभाई पटेल,व इतर मंत्रीमंडळात असणार्या मान्यवरांना अर्पण केली.संविधान अर्पण करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की,हे संविधान कीतीही चांगले असले तरीही चालविणारी मंडळी जर कुचकामी असेल तर हे संविधान पण कुचकामी ठरेल.

पूर्वी संविधान निर्माण होण्याच्या अगोदर मनुस्मृती होती.आणि त्या मनुस्मृती मध्ये फक्त ठराविकांनाच बोलण्याचा, जगण्याचा,राहण्याच्या व जमेल तसे वागण्याचा अधिकार होता.आणि बहुजन व इतरांना म्हणजे. मनुस्मृतीने ठरवून दिलेले चार वर्ण होते.ब्राम्हण,वैश्य, क्षत्रिय व शुद्र या प्रमाणे अधिकार होते. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आले.आणि तेंव्हापासूनच देशातील वर्ण व्यवस्था संपुष्टात आली.देश गुण्यागोविंदाने नांदत राहणार म्हणून देशातील मनुवादी व्यवस्थेला सुरंग लागल्याने आजही हे मनु विचार सरणीच्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एलर्जी वाटायला लागली.म्हणून संविधानाच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने निवडून येणारे जर म्हणजे देशांचे तत्कालीन मंत्री अरुण शौरी व आणखी काही मंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अपमान जनक गरळ ओकतांना पहावयास मिळाली.आणि अलीकडे सध्याचे देशांचे गृहमंत्री अमित शहा यांनी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बद्दल अशी अपमानास्पद गरळ ओकली होती की, आंबेडकर -आंबेडकर- आंबेडकर यांचे नाव घेण्यापेक्षा एकदा जर इश्वराचे नांव घेतले तर तुम्हाला स्वर्ग मिळेल असे अंध विश्वासाचे, अंधश्रद्धा असलेले बालीशपणाचे बोलणे म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे केवळ बौद्ध समाजाचे आहेत.म्हणूनच त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची अवहेलना करून अपमानास्पद बोलणे होय.

आणि या अगोदर आणि आजरोजी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अपमान जनक गरळ ओकणे सुरूच आहे. एवढेच काय तर देशाला संविधान देवून ७५ वर्षे लोटली.शासनाने फक्त नावालाच संविधाननाचा अमृतमहोत्सव साजरा केला.७७ वा प्रजासत्ताक दिन नुकताच २६ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण देशात आणि देशाबाहेर साजरा होत असताना मात्र संविधानाच्या माध्यमातून देशावर,व राज्यांवर राज्य करणारी मंडळी आजच्या दिनी म्हणजे २६ जानेवारी रोजी मुद्दामहून भारतीय घटनाकाराचे भाषणात नाव विसरुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करीत असून आंबेडकरी समाजाच्या भावना दुखवत आहेत.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रजासत्ताक दिनी,फोटो न लावणे, त्यांच्या नावांचा उल्लेख मुद्दामहून टाळणे असे प्रकार घडत आहेत.म्हणून या देशाला जगाला लाजवेल असे संविधान दिले. त्यामध्ये सर्व समाजाला समानतेची वागणूक देणाऱ्या घटनाकाराबद्दल देशाला एलर्जी का असावी.असा प्रश्न राजकुमार पडघान यांनी उपस्थित केला आहे.ज्या ज्या वेळेस राष्ट्रीय उत्सव येतात त्या त्या वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लावून त्यांचा सन्मान करण्याऐवजी अपमानच केला जातो.वास्तविक पहाता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला महान असे संविधान देऊनही आज त्यांचा अपमान केला जात आहे.एकीकडे राष्ट्रीय सण साजरे करतांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लावून सन्मान करावा.असे शासन निर्णय फक्त नावालाच कागदावर काढून त्यांचा शासनकर्त्या कडूनच अपमान चालू आहे. २६ जानेवारी २०२६ हा ७७ वा प्रजासत्ताक दिन संपूर्ण देशात साजरा होत असताना की, ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २६ जानेवारी १९५० ला संविधान अंमलात आले.तेंव्हापासून देश मोठ्या आनंदाने नांदण्याऐवजी द्वेषाच्या गर्दीत दिसून येत आहे. देशातील जनता देशाला न मानता आपआपल्या धर्माला देशांपेक्षा प्रथम स्थान देत असतांना दिसत आहे.त्यामुळे देश प्रगतीपथावर जाण्याऐवजी अधोगतीकडे जात आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत असत धर्मापेक्षा देशाला महत्व दिले तर देशाची सर्व बाजूंनी प्रगती होईल.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात धर्म स्वातंत्र्य दिले.परंतु धर्म स्वातंत्र्य सांभाळून देशाला अधिक महत्त्व दिले पाहिजे.तरच देशाची प्रगती होईल.परंतु संविधान निर्माते हे बौद्ध समाजाचे असल्याचेच त्यांचा शासनकर्ती जमातीला एलर्जी होत आहे.२६ जानेवारी हा दिवस देशासाठी सुवर्ण अक्षरांनी लिहीला तरी कमीच आहे.एवढे महत्व या दिवसाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राप्त करून देवूनही २६ जानेवारी या दिवशी नाशिक जिल्ह्यांचे पालकमंत्री महोदय गिरीश महाजन अनावधानाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषणात नाव विसरतात.आणि उलट दिलगिरी व्यक्त करतात.तर राज्यात बहूतांश ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटोच नसणे म्हणजे देशातील मनुवादी व्यवस्थेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची एलर्जी आहे हे सिद्ध होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'सवाई सर्जाचं चांगभलं'च्या गजरात श्रीनाथ म्हस्कोबाची पालखी वीरकडे रवाना

सासवड (दैनिक संध्या) : माघ शुद्ध पौर्णिमेच्या मुहूर्तावर, रविवारी दुपारी साडेबारा वाजता श्रीक्षेत्र कोडीत (ता. पुरंदर) येथून श्रीनाथ म्हस्कोबा महाराजांच्या पालखीचे श्रीक्षेत्र वीरकडे मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले. श्रीनाथ म्हस्कोबा आणि माता जोगेश्वरी यांच्या शाही विवाह सोहळ्यासाठी निघालेल्या या पालखी सोहळ्याला हजारो भाविकांनी हजेरी लावली होती. दरम्यान, रविवारी पहाटे उत्सवमूर्तींना महारुद्र अभिषेक घालण्यात आला. दुपारी १२:१५ वाजता तुतारीच्या निनादात मानकऱ्यांनी पालखी खांद्यावर घेतली आणि "सवाई सर्जाचं चांगभलं" च्या जयघोषात फुलांची उधळण करत सोहळा मार्गस्थ झाला. याप्रसंगी माजी आमदार संजय जगताप यांच्यासह अनेकांनी दर्शन घेतले. पालखीने नदी ओलांडल्यानंतर 'नागदरी' येथे परंपरेनुसार मेंढ्यांचे रिंगण पार पडले. पालखी भिवडी, सुपे, पिंपळे, पांगारे घाट आणि परिंचे मार्गे सायंकाळी वीर येथे पोहोचली. रविवारी रात्री १२ वाजता श्रीनाथ म्हस्कोबा आणि माता जोगेश्वरी यांचा शाही विवाह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासोबतच पुरंदर तालुक्यातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या १२ दिवसांच्या श्रीक्षेत्र वीर यात्रेला सुरुवात झाली आहे.

### पशुसंवर्धन क्षेत्रात रोजगार व उद्योजकतेला चालना देणारा अर्थसंकल्प : मंत्री पंकजा मुंडे

मुंबई (दैनिक संध्या) : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात कृषि व पशुसंवर्धन क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदी अत्यंत स्वागतार्ह असून या माध्यमातून ग्रामीण व निमशहरी भागात दर्जेदार रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वागत केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना त्या म्हणाल्या, पशुसंवर्धन क्षेत्रासाठी जाहीर केलेल्या सवलती, नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय, प्रयोगशाळा यामुळे देशातील पशुपालकांना मोठा लाभ होणार आहे. याबद्दल मी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानते. पंकजा मुंडे म्हणाल्या की, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्वाचा ठरणार आहे. महिला, वंचित घटकासह पायाभूत सुविधा, गुंतवणूक क्षेत्राला गती मिळणार आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या वैश्विक स्थानाला मजबूत करणारा ठरेल. मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारताला नवी दिशा देणारा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पामध्ये कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय क्षेत्राला दिलेल्या सवलती व सुविधामुळे गावातच रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. पशुसंवर्धन क्षेत्रासाठी कर्ज-संलग्न अनुदान कार्यक्रम, पशुधन उद्योगांचे आधुनिकीकरण तसेच दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनावर आधारित एकात्मिक मूल्य साखळ्यांच्या निर्मितीमुळे शेतकरी आणि युवकांसाठी उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पशुधनाचा शेतीच्या एकूण उत्पन्नात सुमारे 16 टक्के वाटा असून, विशेषतः गरीब व अल्पभूधारक कुटुंबांच्या उत्पन्नात याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पशुवैद्यकीय व्यावसायिकांची संख्या 20 हजारांपेक्षा अधिक वाढवण्याच्या दृष्टीने खाजगी क्षेत्रात पशुवैद्यकीय व सहायक पशुवैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि प्रजनन सुविधांसाठी प्रस्तावित कर्ज-संलग्न भांडवली अनुदान योजना ही दीर्घकालीन दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरेल, असेही मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या. भारतीय आणि परदेशी संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देण्याच्या निर्णयामुळे आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कौशल्य विकासाला गती मिळेल. या तरतुदींचा प्रभावी लाभ महाराष्ट्रातील पशुपालक, दुग्ध उत्पादक आणि कुक्कुटपालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या समन्वयाने आवश्यक पावले उचलणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



### 'विकसित भारत ' हा केवळ संकल्प नसून कामगार आणि सामान्यांच्या प्रगतीचा मार्ग

■ कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

मुंबई (दैनिक संध्या) : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांपासून सुरू ठेवलेल्या नियोजनबद्ध विकासामुळे आज भारताची अर्थव्यवस्था जगासाठी एक आशेचा किरण ठरली आहे. केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला आजचा अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो देशातील गरीब, शेतकरी आणि कष्टकरी कामगारांचे जीवनमान उंचावणारा ठरणारा आहे, अशी भावना राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे. कामगार मंत्री श्री फुंडकर म्हणाले, राज्यातील पायाभूत सोयी सुविधांसाठी अर्थसंकल्पात दिलेल्या भरीव निधीमुळे राज्यातील ' इन्फ्रास्ट्रक्चर' जागतिक स्तराचे होण्यास मदत मिळणार आहे. देशांतर्गत उत्पादनावर दिलेला भर आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी केलेली १० हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद ही देशातील औद्योगिक क्रांतीला नवी दिशा देणारी आहे. वस्त्रोद्योग क्लस्टरच्या विकासामुळे आणि खनिज कॉरिडॉरमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, ज्याचा सर्वाधिक फायदा तरुण कामगार वर्गाला होईल. सामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सरकारने कॅन्सर आणि मधुमेहाची औषधे स्वस्त करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दिलासादायक आहे. तसेच, बायोफार्मा उत्पादनासाठी १० हजार कोटींची तरतूद करून भारताला या क्षेत्राचे जागतिक 'हब' बनवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यामुळे आरोग्य सुविधा अधिक सक्षम आणि परवडणाऱ्या होतील, असेही कामगार मंत्री ॲड फुंडकर यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या खादी आणि हातमाग क्षेत्रासाठी 'महात्मा गांधी ग्रामस्वराज' अभियान ही क्रांती आहे. हातमाग उत्पादनात वाढ झाल्यामुळे ग्रामीण कारागिरांच्या कौशल्याला जागतिक बाजारपेठ मिळेल आणि त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढवण्यावर दिलेला भर आणि ४ राज्यांमध्ये प्रस्तावित असलेले खनिज कॉरिडॉर हे भारताच्या सर्वांगीण विकासाचे निदर्शक आहेत. आर्थिक विकास दरात सातत्याने वाढ करणे हे आमचे पहिले कर्तव्य असून सरकार त्या दृष्टीने ठोस पावले उचलत आहे, असेही मंत्री ॲड फुंडकर म्हणाले.



# पश्चिम आशियातील शांततेसाठी अरब राष्ट्रांची भूमिका कौतुकास्पद

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ अरब राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांशी भेट

■ भारत आणि अरब राष्ट्रांमध्ये व्यापक धोरणात्मक भागीदारी

■ या बैठकीमुळे ऊर्जा पुरवठा साखळी अधिक मजबूत होण्यास मदत

अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांनी पश्चिम आशियामध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी अरब राष्ट्रांनी बजावलेल्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. दुसऱ्या भारत-अरब परराष्ट्रमंत्री बैठकीसाठी अरब राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री सध्या नवी दिल्लीच्या दौऱ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर ही भेट झाली.

पंतप्रधान कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'भारत आणि अरब जगतातील खोलवर रुजलेले ऐतिहासिक आणि जनसामान्यांमधील संबंधांवर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला. हे संबंध वर्षानुवर्षे दोन्ही बाजूंमधील नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रेरणा देत आहेत.' पंतप्रधानांनी भारत-अरब भागीदारीसाठी भविष्यातील आपला दृष्टिकोन मांडला. व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि आरोग्य सेवा यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये दोन्ही बाजूंच्या लोकांच्या परस्पर फायद्यासाठी सहकार्य अधिक वाढवण्याबाबत त्यांनी भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या बैठकीत मोदींनी पॅलेस्टिनी जनतेला भारताचा पाठिंबा कायम असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले. तसेच, गाझा शांतता आराखड्यासह (गाझा पिस प्लॅन) शांततेसाठी सुरू असलेल्या विविध प्रयत्नांचे त्यांनी स्वागत केले. प्रादेशिक शांतता आणि स्थिरतेसाठी अरब लीगने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दलही पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## उपजिल्हाधिकारी जयराम पवार यांची विशेष मुलाखत

मुंबई (दै. संध्या) :

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित होणाऱ्या 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मंगळवारी 3 फेब्रुवारी, 2026 रोजी रात्री 8.00 वाजता 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. या मुलाखतीत "हिंद-दी-चादर" शहीदी समागम समितीचे सदस्य तथा उपजिल्हाधिकारी जयराम पवार या कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त 18 व 19 फेब्रुवारी 2026 रोजी खारघर, नवी मुंबई येथे भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक राज्य तसेच देशातून उपस्थित राहणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे विचार, त्याग आणि मानवतावादी मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनामार्फत विविध जनजागृतीपर तसेच शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही श्री. पवार यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून दिली आहे. या कार्यक्रमानिमित्त शीख, शिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासीन तसेच वारकरी संप्रदाय समुदाय एकत्र सहभागी होत आहेत. या समाजाचा इतिहास, संस्कृती त्यांचे गुरु नानक आणि गुरु तेग बहादुर यांच्याशी कसा संबंध आहे, याबद्दल अधिक माहिती दिली आहे.

## नवा भारत घडवण्याच्या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरणारा अर्थसंकल्प

मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई (दै. संध्या) :



प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात आत्मनिर्भर नवा भारत घडवण्याच्या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरणारा अर्थसंकल्प आज केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सादर केला आहे. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था निर्माण होण्याच्या दृष्टीने पावलं पुढं पडत असून ७.४ टक्के विकास दराचे उद्दिष्ठ गाठण्याचा या २०२६-२७ या अर्थसंकल्पीय वर्षात प्रयत्न होणार आहे अशी प्रतिक्रिया कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केली.

मंत्री श्री लोढा म्हणाले की,देशातील मध्यमवर्ग, गरीब आणि शेतकऱ्यांना समृध्द करणारा हा अर्थसंकल्प आर्थिक प्रगतीचे शिखर गाठणारा ठरणार आहे. शेतकऱ्यांसाठी बहुभाषिक AI तंत्रज्ञान विकसित करून अत्याधुनिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ' बायो फार्मा मिशन' औषधांच्या केवळ किमती कमी करणारे नाही तर, जागतिक औषध बाजारपेठेत भारत एक औषध निर्मितीचे ग्लोबल हब होणार आहे. त्याचबरोबर या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रावर ही भर देण्यात आला असून पाच नव्या विद्यापीठासह तीन आयुर्वेदिक महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. या निमित्ताने भारतीय आयुर्वेद शास्त्र जगातल्या कानाकोपऱ्यात पोहचवले जाणार आहे. या घोषणेसह डिजिटल आणि क्रिएटिव्ह स्किल्स वाढवण्यासाठी सरकारने एबीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब सुरु करण्याची योजना आखली आहे.या अनुषंगाने १५ हजार माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयात कंटेंट क्रिएटर लॅबची सुरुवात होणार आहे. ज्यामुळे डिजिटल तंत्रज्ञान कौशल्य शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच उच्च शिक्षण संस्थांसाठी प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृहे बांधण्याची घोषणा देखील केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केली आहे.


मोठ्या शहरांसह छोट्या शहरांमध्ये पायाभूत सुविधा वाढवण्यात येणार आहेत. देशभरात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर तयार करण्यात येणार असून यात मुंबई आणि पुणे ही जोडण्यात येणार असल्याने महाराष्ट्रातील व्यापारी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होणार आहे. तसेच तरुणांना रोजगाराच्या संधी सह एमएसएमई (MSME) क्षेत्राला जागतिक स्तरावर अग्रणी बनवण्यासाठी सहा धोरणात्मक क्षेत्रांमध्ये मोठा बदल करण्याची घोषणा करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीने परिपूर्ण असा अर्थसंकल्प अर्थमंत्री श्रीमती सीतारामन यांनी मांडला असून भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात योगदान देणारा हा अर्थसंकल्प आहे.

## विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणारा अर्थसंकल्प

पणन मंत्री जयकुमार रावल

मुंबई (दै. संध्या) :

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज सादर केलेला २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा 'विकसित भारत' या संकल्पनेला बळ देणारा, सर्वसमावेशक आणि देशाच्या दीर्घकालीन विकासाची स्पष्ट दिशा मांडणारा आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली. या अर्थसंकल्पातून ग्रामीण व शहरी विकासातील समतोल, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा विस्तार आणि आत्मनिर्भर भारत या चारही क्षेत्रांना एकाच वेळी गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.



हा अर्थसंकल्प केवळ उत्पादनवाढीपुरता मर्यादित नसून शेतमालाची विक्री, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेतील संधी वाढवणारा असल्याने कृषी पणन व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या अर्थसंकल्पात कृषी व कृषीपूरक उद्योगांना प्रोत्साहन देताना शेतमाल थेट बाजारपेठेशी जोडण्यावर भर देण्यात आला आहे. 'एक जिल्हा- एक उत्पादन' या संकल्पनेमुळे स्थानिक पातळीवरील शेतमाल, प्रक्रिया केलेली उत्पादने आणि हस्तकला वस्तूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होणार असून याचा थेट फायदा शेतकरी व उत्पादक समूहांना होणार आहे. यामुळे मध्यस्थांची संख्या कमी होऊन शेतकऱ्यांच्या मालाला स्पर्धात्मक दर मिळण्यास मदत होईल, असे मंत्री रावल यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व डिजिटल तंत्रज्ञानाचा शेतीत वाढता वापर हा कृषी पणन व्यवस्थेतही क्रांतिकारक बदल घडवणारा ठरेल. उत्पादनाचा अंदाज, मागणी-पुरवठा विश्लेषण, किमतींचे पूर्वानुमान आणि लॉजिस्टिक व्यवस्थापन अधिक सक्षम झाल्याने बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढेल. यामुळे शेतमालाची साठवणूक, वाहतूक व विक्री अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



## राजधानीत संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली (दै. संध्या) :

संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी कॉपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, उपअभियंता किरण चौधरी तसेच महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी संत रविदास महाराज यांच्या सामाजिक समतेच्या संदेशाचा, त्यांनी भक्तीमार्गातून केलेल्या समाजप्रबोधनाचा आणि मानवतेच्या कल्याणासाठी दिलेल्या योगदानाचा सर्वांना परिचय करून दिला.

# केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी एआयला केंद्रस्थान

मुंबई (दै. संध्या) :

■ अजितदादांचे स्वप्न पुर्ण करण्याकडे भर : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

■ शेती व संलग्न क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी; शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीला चालना



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात शेती आणि शेतकरी हे केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहेत. केंद्र सरकारतर्फे मांडण्यात आलेला हा अर्थसंकल्प शेती व शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारा ठरेल, असा विश्वास वाटतो. कृषी बजेट वाढवून सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे संकेत देण्यात आले असून ही बाब महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी निश्चितच आनंदाची आहे. कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी मोठ्या घोषणा करताना देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे यावर विशेष भर देण्यात आला आहे अशी प्रतिक्रिया कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली.

स्वर्गीय उपमुख्यमंत्री अर्थमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून राज्याच्या गतवर्षीच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी ५५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेती क्षेत्रात एआय धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. तसेच राज्याच्या कृषी विभागाने 'महा-विस्तार' ॲप विकसित केले आहे. याच दिशेने पुढचे पाऊल टाकत केंद्र सरकारने या अर्थसंकल्पात 'Bharat Vistar' नावाचे एआय-आधारित बहुभाषिक कृषी सहाय्यक साधन जाहीर केले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत योग्य वेळी हवामान, पीक नियोजन, कीड-रोग नियंत्रण आणि बाजारपेठेची माहिती मिळणार असून निर्णयप्रक्रिया अधिक सुलभ होईल. डिजिटल शेतीच्या विकासाची दिशा या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसून येते.

उच्च मूल्य पिके, पीक विविधीकरण, मत्स्यव्यवसायात व पशुपालन, सिंचन तसेच एआयसारख्या तंत्रज्ञानाधारित शेतीवर दिलेला भर स्वागतार्ह आहे. कापसाचे उत्पादन व गुणवत्ता वाढवण्यासाठी केंद्र सरकार विशेष योजना राबवणार आहे. फलोत्पादनाला चालना देण्यासाठी नारळ, चंदन व काजू यांसारख्या उच्च मूल्य नगदी पिकांचे उत्पादन वाढवले जाणार असून काजू व कोको यांना जागतिक ब्रँड म्हणून उभारणी करण्यावर भर देण्यात आला आहे. मत्स्यपालनाला चालना देण्यासाठी देशभरात ५०० नवीन 'अमृत जलाशय' उभारले जाणार असून यामुळे मत्स्य उत्पादकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. तसेच मत्स्य संपदा योजनेचा विस्तार करून मत्स्य विक्रेते व सूक्ष्म उद्योगांसाठी ६,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पुढील काळात १० दशलक्ष शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्यासाठी सरकार मदत करणार असून, काढणीनंतर होणारे नुकसान टाळण्यासाठी विकेंद्रित साठवणूक क्षमता निर्माण केली जाणार आहे.

२०२६-२७ च्या आर्थिक सर्वेक्षणात भारतीय शेती अधिक शाश्वत व फायदेशीर बनवण्यासाठी युरिया अनुदान प्रणालीत सुधारणा, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून पोषक तत्त्वांवर आधारित मॉडेल स्वीकारण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच कृषी निर्यातीसाठी स्थिर व दीर्घकालीन निर्यात धोरण ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

तसेच ॲग्री बिझनेस नेटवर्कसाठी १६७ कोटी रुपये, उपसा सिंचन योजनांच्या सौर ऊर्जिकीकरणासाठी २०७ कोटी रुपये आणि कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन योजनेसाठी ६४६ कोटी रुपये अशी तरतूद करण्यात आली असून या बाबी शेती व संलग्न क्षेत्रांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत.

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन या परस्परपूरक घटकांसाठी भरीव तरतुदी व योजनांची घोषणा करण्यात आल्याने या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन त्यांचा सर्वांगीण विस्तार होईल.

केंद्र व राज्य सरकार समन्वयाने काम करत असताना, या अर्थसंकल्पातील तरतुदींचा जास्तीत जास्त लाभ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन कटिबद्ध आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीला नफ्याचा व्यवसाय बनवणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राला शेती क्षेत्रात विकासाची नवी झेप घेण्यासाठी हा अर्थसंकल्प निश्चितच महत्त्वाचा ठरेल.

# नवीन आयकर कायदा स्वागतार्ह : सीए गार्डी

**पिंपरी (दै. संध्या) :**



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्प २०२६ मध्ये करप्रणालीत मूलभूत बदल करण्याचा सरकारचा स्पष्ट प्रयत्न दिसून येतो. १ एप्रिल २०२६ पासून अंमलात येणारा नवीन आयकर कायदा, २०२५ हा करदात्यांसाठी प्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आला असला, तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम विशेषतः लघु व मध्यम व्यावसायिकांसाठी संमिश्र स्वरूपाचा ठरणार आहे.

या अर्थसंकल्पातील महत्त्वाचा आणि स्वागतार्ह निर्णय म्हणजे व्यावसायिक करदात्यांसाठी प्राप्तिकर विवरणपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबरऐवजी ३१ मार्च करण्यात आलेली आहे. या बदलामुळे छोट्या व्यावसायिकांना त्यांच्या आर्थिक व्यवहारांची योग्य पडताळणी, लेखापुस्तकांची पूर्तता तसेच करनियोजन करण्यासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त वेळ उपलब्ध होणार आहे. अनेक वर्षांपासून व्यावसायिक वर्गाकडून होत असलेली ही मागणी अखेर मान्य करण्यात आल्याचे म्हणता येईल.

परदेश प्रवास आणि टूर पॅकेजेसवर आकारण्यात येणाऱ्या स्रोतावर कर संकलनातही लक्षणीय कपात करण्यात आली आहे. यापूर्वी ५ ते २० टक्क्यांपर्यंत असलेला टीसीएस आता थेट २ टक्के करण्यात आला आहे. या निर्णयामुळे पर्यटन व्यवसायाशी संबंधित ट्रॅव्हल एजंट्स, टूर ऑपरेटर्स तसेच सेवा पुरवणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना आर्थिक दिलासा मिळेल आणि व्यवहारांमध्ये सुलभता येण्यास मदत होईल. अनिवासी भारतीयांकडून मालमत्ता खरेदी करताना येणाऱ्या प्रक्रियात्मक अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने सरकारने टॅन काढण्याची अट रद्द केली असून, आता केवळ पॅनच्या आधारे टीडीएस कपात करता येणार आहे. हा बदल मालमत्ता व्यवहार अधिक पारदर्शक व कमी खर्चिक करण्यास उपयुक्त ठरेल.

एमएसएमई क्षेत्रासाठी कमी खर्चात करपालन सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सरकारने 'पॅरा प्रोफेशनल्स' आणि 'कॉर्पोरेट मित्र' ही संकल्पना पुढे आणली आहे. योग्य प्रशिक्षण, अनुभव आणि जबाबदारीची जाणीव असल्यास ही यंत्रणा छोट्या व्यावसायिकांसाठी सहाय्यक ठरू शकते. तथापि, कंपनी पोर्टल, वस्तू व सेवा कर पोर्टल आणि आयकर पोर्टल या डिजिटल प्रणाली आजही अनेकदा तांत्रिक अडचणींनी ग्रस्त असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

अल्पशिक्षित किंवा अपुरी तांत्रिक माहिती असलेल्या पॅरा प्रोफेशनल्समार्फत ऑडिट किंवा करपालनाची कामे झाल्यास, भविष्यात चुका वाढून व्यावसायिकांना कर नोटिसी, दंड व अनावश्यक वादांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे 'कॉर्पोरेट मित्र' ही संकल्पना यशस्वी होण्यासाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, कडक देखरेख आणि स्पष्ट जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

या अर्थसंकल्पात 'ऑडिट पेनाल्टी'ऐवजी 'ऑडिट फी' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात याचा अर्थ असा की, जर ऑडिट वेळेत पूर्ण झाले नाही, तर ऑडिट अहवाल पोर्टलवर अपलोड करण्यासाठी आधी फी भरावी लागणार आहे. त्यामुळे छोट्या व्यावसायिकांसाठी वेळेत ऑडिट पूर्ण करणे ही आता केवळ शिस्त नव्हे, तर आर्थिक गरज बनली आहे.

एकूणच, बजेट २०२६ मध्ये कर संकलन वाढवण्यापेक्षा कर प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यावर सरकारचा भर दिसतो. 'कॉर्पोरेट मित्र' ही संकल्पना एमएसएमई क्षेत्रासाठी खरोखरच फायदेशीर ठरेल की नाही, हे पूर्णतः तिच्या अंमलबजावणीच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल. करपालनाचा बोजा प्रत्यक्षात कमी करण्याऐवजी तो कमी खर्चात करण्याचा जो प्रयत्न करण्यात आला आहे, त्यापेक्षा डिजिटल पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे अधिक आवश्यक होते. मात्र, आयकर विवरणपत्रासाठी दिलेली मुदतवाढ आणि टीसीएसमधील कपात हे निर्णय नक्कीच सकारात्मक आणि स्वागतार्ह आहेत.

— सीए सुहास गार्डी (मा. अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सीए शाखा)

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात भाजप नगरसेवकांच्या गटाची नोंदणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या गटनेतेपदी श्री. प्रशांत शितोळे यांची अधिकृत निवड करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी शनिवारी (दि.३१) दिली. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील नवनिर्वाचित नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत नगरसेवकांच्या गटाची अधिकृत नोंदणी केली आहे. याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरामध्ये भाजपने अभूतपूर्व यश मिळवले. शहरामध्ये भाजपच्या माध्यमातून गेल्या नऊ वर्षात अनेक सुविधा निर्माण झाल्या. नागरिकांना अत्याधुनिक मेट्रो सुविधेपासून चांगले रस्ते, पाणी व्यवस्थापन, करप्रणालीत सुसूत्रता, कचऱ्याचे नियोजन, सक्षम आरोग्य योजना अशा सर्वंकष विकासावर 'फोकस' ठेवला. यामुळे नुकत्याच पार पडलेल्या मनपा निवडणुकीमध्ये नागरिकांनी भाजपला भरभरून प्रतिसाद दिला. शहरवासीयांनी भाजपाला एक हाती कौल दिलेला आहे. नागरिकांचा हा विश्वास भाजप सार्थ केल्याशिवाय राहणार नाही. आगामी काळात नागरिकांना आवश्यक सुविधा देण्याबरोबरच सुरक्षित, पर्यावरण पूरक शहराची अनुभूती देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. याच माध्यमातून आज अनुभवी प्रशांत शितोळे यांना गटनेता म्हणून निवड केलेली आहे. पालिकेच्या माध्यमातून केली जाणारी कामे नागरिकांच्या हिताच्या दृष्टीतून कोणाकडूनच केली जातील. यासाठी प्रशांत शितोळे यांच्या अनुभवाचा नक्कीच सर्वच नगरसेवकांना फायदा होणार आहे. सर्वांना सोबत घेऊन, सर्वांच्या विचाराने ते काम करतील असा विश्वास सर्वांनाच आहे. श्री. प्रशांत शितोळे यांच्या नेतृत्वाखाली भाजप नगरसेवक सकारात्मक आणि परिणामकारक कामकाजावर लक्ष केंद्रित करतील. नगर विकास, नागरिक सेवा आणि शहराच्या प्रगतीसाठी भाजप सदैव सक्रिय राहणार असल्याचे जगताप यांनी सांगितले.



### लाडक्या 'अजितदादांना' सर्वपक्षीय नेत्यांनी वाहिली श्रद्धांजली

पिंपरी (दैनिक संध्या) : कामाचा माणूस अशी ख्याती असलेले महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) अपघाती निधन झाले. आणि गुरुवारी सकाळी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच दिवशी (दि. २९) संध्याकाळी पाच वाजता खोपोली शहरातील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांकडून दादांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कर्जत मतदार संघ अध्यक्ष अश्विनी पाटील, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, सुरेखा खेडकर, कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते उल्हासराव देशमुख, शिवसेनेचे जेष्ठ नेते मोहन औसरमल, माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर यांच्यासह विविध पक्ष पदाधिकाऱ्यांनी दिवंगत अजित पवार यांच्या अशा अचानक जाण्याने दुःख व्यक्त केले. यावेळी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या पुढाकाराने हा सर्वपक्षीय श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### बीआरटी मार्ग की मृत्यूचा सापळा? बीआरटी मार्गात खासगी वाहनांची 'घुसखोरी' वाढली



पिंपरी (दैनिक संध्या) : शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या बीआरटी (बस रॅपिड ट्रान्झिट) मार्गांवर सध्या खासगी वाहनांचा वाढता शिरकाव ही गंभीर समस्या बनली आहे. जलद, सुरक्षित आणि वेळेत प्रवासी वाहतूक उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या बीआरटी व्यवस्थेचा मूळ उद्देशच या बेशिस्त वाहनचालकांमुळे धोक्यात आला आहे. याचा थेट फटका प्रवाशांच्या सुरक्षिततेला तसेच पीएमपीएमएलच्या बसचालकांना बसत आहे.निगडी, आकुर्डी, चिंचवड, फुगेवाडी, कासारवाडी, वाकड, रावेत, पिंपळे सौदागर तसेच भोसरी परिसरातील बीआरटी मार्गांवर दुचाकी, चारचाकी आणि रिक्षाचालक मोठ्या प्रमाणावर नियमांचे उल्लंघन करत असल्याचे सातत्याने दिसून येत आहे. बीआरटी मार्ग हा केवळ पीएमपीएमएल बससाठी राखीव असतानाही अनेक ठिकाणी खासगी वाहनांना प्रवेश नाही असे स्पष्ट सूचना फलक लावण्यात आले आहेत. मात्र हे फलक वाहनचालकांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले जात असून, वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली होत आहे.विशेषतः रावेत बीआरटी मार्गावर खासगी वाहनांची घुसखोरी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे.

### भाजपमध्ये 'आयात' गटनेत्यामुळे बंडाची ठिणगी? नगरसेवकांमध्ये संताप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर सत्तास्थापनाची गणिते जुळत असतानाच, गटनेतेपदाच्या नियुक्तीद्वारे भाजपने पुन्हा एकदा जुन्या जाणत्या निष्ठावंताना डावलत निवडणुकीपूर्वी पक्षात प्रवेश केलेल्या नगरसेवकास गटनेते पद बहाल केले. निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतर पहिले पदच आयात उमेदवाराला दिल्याने जुन्या निष्ठावंतांना डावलण्याची नवी परंपरा सुरूच राहणार असल्याचे संकेत मिळू लागले आहेत.नगरसेवकांच्या शुक्रवारी (दि. ३०) झालेल्या बैठकीत प्रशांत कृष्णाराव शितोळे यांची गटनेतेपदी नियुक्ती जाहीर होताच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावल्या. महापालिकेत भाजपाचे एकूण ८४ नगरसेवक निवडून आले असून, त्यापैकी निम्म्याहून अधिक नगरसेवक गेल्या पंचवार्षिक काळातही भाजपकडून निवडून आले होते. दुसरीकडे, निवडणुकीआधी विविध पक्षांतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या काही नेत्यांना थेट उमेदवारी मिळाली आणि ते निवडूनही आले. प्रशांत शितोळे राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश करून सांगवीतील प्रभाग क्रमांक ३२ मधून मोजक्या मतांनी विजय मिळवला. पक्षाच्या अधिकृत पत्रावर प्रदेशाध्यक्षाच्या सहीने एकमताने निवड झाली असल्याचे म्हटले असले तरी अनेक नगरसेवकांमध्ये नाराजी असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या.

## पिंपरीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी प्रभाग क्रमांक 21 मधील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सभागृहामध्ये ग्रामस्थांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याने शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक संदिप वाघेरे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. शहरातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, शिक्षण, आरोग्य तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे वाघेरे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड शहराच्या प्रगतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. त्यांच्या जाण्याने राज्याने एक दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास नगरसेवक हिरानंद आसवानी, निकिता कदम, प्रियांका कुदळे, गिरिजादेवी कुदळे, दीपिका कापसे, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष वसंत तावरे, सुधाकर यादव, स्वामी सर, कैलास भुजबळ, तसेच सामाजिक कार्यकर्ते शेखर अहिरराव, राजेंद्र वाघेरे, किशोर येळवंडे, राकेश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अजितदादा आणि रुपलेखाताईंच्या निधनाने तालुका हळहळला



**मावळ (दै. संध्या) :**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि मावळ विधानसभेच्या पहिल्या महिला आमदार श्रीमती रूपलेखाताई ढोरे तसेच कार्ला गावातील सामाजिक कार्यकर्ते शांताराम सोंडेकर या तिन्ही दिवंगत मान्यवरांना ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अजितदादा पवार आणि रुपलेखाताई ढोरे या दिग्गज नेत्यांच्या निधनामुळे संपूर्ण मावळ तालुक्यावर शोककळा पसरली आहे. एकाच वेळी राज्याचे आणि तालुक्याचे नेतृत्व अचानकपणे हरपल्याने मावळवासीयांना मोठा धक्का बसला आहे. मावळ तालुक्यातील शहरासह प्रत्येक गावात संध्याकाळी सात वाजता शोकसभांचे आयोजन करण्यात आले. त्यासोबतच कार्ला गावात देखील या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. शोकसभेत कार्ला ग्रामस्थांसह सर्वपक्षीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, संघटनाचे आणि विविध संस्थांचे पदाधिकारी देखील यावेळी उपस्थित होते. या शोकसभेत उपस्थितांनी अजितदादांच्या आणि रूपलेखाताईंच्या आठवणींना उजाळा दिला.

## तुकोबारायांच्या मंदिर उभारणीत सहभागी होणारे भाग्यवान

**देहू (दै. संध्या) :**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे मंदिर श्रीक्षेत्र भंडारा डोंगर येथे साकारत असून या पवित्र कार्यात सहभागी होणारे सर्व भाविक भाग्यवान आहेत, असे प्रतिपादन पंढरपूर येथील संत नामदेव महाराजांचे वंशज हभप श्रीगुरू केशव महाराज नामदास यांनी केले.संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती, संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळा, संत नामदेव महाराज व संत जनाबाई संजीवन समाधी सोहळा, संत सावता माळी जयंती आणि तपोनिधी नारायण महाराज त्रिशतकोत्तर प्रकाट्य वर्षानिमित्त छोटे माऊली महाराज कदम यांच्या नेतृत्वाखाली श्रीक्षेत्र भंडारा डोंगर ट्रस्टच्या वतीने अखंड हरीनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी व गाथा पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सातव्या दिवशी हभप केशव महाराज नामदास यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. भंडारा डोंगर हा जगद्गुरू तुकाराम महाराजांची चिंतनभूमी असून येथे महाराजांनी मोठी तपश्चर्या केली. या डोंगराच्या मातीला महाराजांच्या चरणरजांचा स्पर्श लाभल्याने या भूमीचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. आई जिजाई विठ्ठल नामाचा आवाज ऐकत महाराजांचा शोध घेत डोंगरावर जाऊन त्यांची सेवा करत असत, अशी माहितीही त्यांनी सांगितली. या सोहळ्यात पहाटे काकडा, विठ्ठल-रुक्मिणी व तुकोबारायांच्या मूर्तींची विधिवत पूजा व अभिषेक करण्यात आला. सकाळच्या सत्रात ज्ञानेश्वरी व गाथा पारायण झाले.

## रोटरी क्लब पिंपरीने केला दोन खेडेगावांचा कायापालट

**पिंपरी (दै. संध्या) :**




रोटरी क्लब ऑफ पिंपरीच्या वतीने बायफ संस्था, आणि टाटा मोटर्स यांच्या सहकार्याने हॅप्पी व्हिलेज अंतर्गत खारपुर आणि खोपेवाडी(ता. खेड) आदिवासी गावांतील अंतर्गत विकास करून केला कायापालट. तब्बल १० वर्षे चाललेल्या या हॅप्पी व्हिलेज प्रकल्पाची सांगता समारंभ रोटरी कम्युनिटी सेंटर चिंचवड येथे पार पडला.

यावेळी माजी प्रांतपाल माधव बोराटे, कैलास मोंगा, क्लबचे अध्यक्ष संपत आनंद, सचिव रोहन रोकडे, प्रकल्प संचालक धनंजय भिंगे, माजी अध्यक्षा डॉ विभा झूत्शी,बायफ संस्थेचे कृषी शास्त्रज्ञ सागर कडव, कार्यक्रम संचालिका राजश्री जोशी, टाटा मोटर्सचे सीएसआर प्रमुख रोहित सरोज आणि ग्रामस्थ इतर मान्यवर उपस्थित होते. सुमारे १कोटी २ लाख रुपये खर्च करून १० वर्षापूर्वी सुरू केलेल्या या हॅप्पी व्हिलेज अंतर्गत या दोन्ही गावात विविध उपक्रम राबवले. यामध्ये मुबलक पाणी उपलब्धतेसाठी बंधारे व विहीर बांधणी केली. शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, शास्त्रोक्त पद्धतीने बांबू, आंबे, भात इतर पीक लागवडी साठी आधुनिक पद्धतीने प्रशिक्षण, धरणाची डागडुजी केली. सौर ऊर्जेच्या सहाय्याने जल उपसा सुविधा करून दिली. असे उपक्रम राबवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसाठी शिक्षण,आरोग्य तपासणी यावर विशेष भर दिला. या तिन्ही संस्थांच्या पुढाकाराने दोन्ही गावातील २५० कुटुंबाच्या आयुष्यात अमुलाग्र बदल घडून आला. शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढले. याप्रसंगी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माधव बोराटे म्हणाले कि, शेती हा एक प्रकारचा उद्योगच आहे.पण शेतीकडे उद्योगाच्या दृष्टीने आपण पाहत नाही. मात्र शेती करताना पुरेसे भांडवल, कला, कौशल्य, ज्ञान अपुरे पडत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष आनंद संपत यांनी केले. सूत्रसंचालन कुशल शहा, ख्याती शहा यांनी तर आभार नियोजित अध्यक्ष बाबा भापकर यांनी मानले.

## सुतार समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी (दै. संध्या) :**



अखिल महाराष्ट्र विश्वकर्मा सुतार समाज महासंघ,श्री विश्वकर्मा सुतार समाज मेडिकल असोसिएशन,विश्वकर्मा सुतार समाज समन्वय समिती, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भव्य वधू-वर व पालक परिचय महामेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हा महामेळावा दिवंगत ज्ञानेश्वर भालेराव यांच्या समाजकार्याच्या विचारांना समर्पित करण्यात आला. यावेळी महामेळाव्याचे समन्वय समिती मुख्य प्रशासक तथा राज्य समन्वयक विद्यानंद मानकर बोलताना म्हणाले कि,"समाजातील विवाह विषयक अडचणी दूर करून तरुण पिढीला विश्वास, पारदर्शकता आणि सन्मानाने नातेसंबंध जोडण्याची संधी मिळावी, हाच या महामेळाव्याचा खरा उद्देश आहे. समाज एकत्र आला तर कोणतीही अडचण अशक्य राहत नाही." कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते पी जी सुतार धुळे होते. उद्घाटन प्रतिभाताई भालेराव व प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय सुतार यांनी केले. प्रमुख उपस्थितीमध्ये समाजातील विविध पदाधिकारी, संघटनांचे अध्यक्ष, सचिव, कार्यकर्ते, तसेच शिक्षण, आरोग्य, उद्योग व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदविला.

महामेळाव्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे समाजहित लक्षात घेऊन फक्त १ रुपयात वधू-वर नाव नोंदणी, तसेच फक्त १९ रुपयांत संपूर्ण महाराष्ट्राची वधू-वर सूची (पुस्तिका) उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय इच्छुक समाजबांधवांसाठी *फक्त ५१ रुपयांत सामुदायिक विवाह करण्याचा संकल्प महासंघाच्या वतीने करण्यात आला.

या महामेळाव्यात वधू-वर व पालकांना थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने अनेक स्थळे निश्चित होण्याच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण झाले. समाजातील विवाह विषयक अडचणी दूर करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या महामेळाव्यास महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून समाजबांधव, पालक, युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी समन्वय समितीचे सर्व पदाधिकारी, संलग्न संस्थांचे प्रतिनिधी, महिला आघाडी, युवक कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

हा महामेळावा समाजासाठी दिशादर्शक, प्रेरणादायी व एकोप्याचा संदेश देणारा ठरल्याचे मत उपस्थितांनी व मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन किशोर कदम व ग्रंथमित्र रमेश सुतार यांनी तर सोमनाथ भागवत यांनी आभार मानले. यावेळी सुतार समाजातील उद्योजकांना उद्योगरत्न पुरस्कार २०२६ देवून सन्मानित करण्यात आले.

नारायण क्षीरसागर (नाशिक),दिपक शेलार (धुळे), विश्वकर्मा शार्दुल( नाशिक),राजेंद्र जाधव(नाशिक),भगवान राऊत( छ. संभाजीनगर), के डी शार्दुल (छ. संभाजीनगर),सौ मधु भागवत (पिं चिं),सुभाष सूर्यवंशी(लोणावळा), दिलीप अकोटकर (अमरावती), बंडूभाऊ माणूसमारे(नागपूर),नारायण शेलार(मुंबई), गणेश सुतार(निगडी), अजय क्षीरसागर(पुणे) यांचा समावेश आहे. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार पी जी सुतार (धुळे),डॉ संदानंद राऊत (नारायणगाव),डॉ कृष्णकांत मानकर (पिं- चिं) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# विद्यार्थ्यांना फी न भरण्याच्या कारणावरून डांबून ठेवले

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

इयत्ता बारावीच्या बोर्डाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या दिवशी केवळ फी न भरल्याच्या कारणावरून चार विद्यार्थ्यांना परीक्षेत बसू न देता .सकाळी ९ ते ११ या वेळेत डांबून ठेवण्याबाबतची तयार आल्याची निलेश काळभोर यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात केली आहे .ही धक्कादायक घटना एंजल हायस्कूल, कदमवाकवस्ती येथे घडली.

राजवीर बाजीराव सायकर, हिमेश सतीश आटोले, शिवतेज निलेश काळभोर व जान्हवी योगेश महाजन हे विद्यार्थी आज प्रात्यक्षिक परीक्षेसाठी उपस्थित असतानाही, संस्थेतील खुशबू सिंग व नंदा मॅडम यांनी त्यांना परीक्षेत बसु दिले नाही .

विशेष म्हणजे, फी भरण्यासाठी वेळ देण्याची विनंती करण्यात आली होती. काही पालकांनी चेकद्वारे फी भरण्याची तयारीही दर्शवली होती. मात्र, तरीही विद्यार्थ्यांना परीक्षेत बसू दिले गेले नाही. इतकेच नव्हे तर सकाळी ९ वाजता शाळेत बोलावून घेऊन, सकाळी ११ वाजेपर्यंत कोणतेही ठोस कारण न देता विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरातच थांबवून ठेवण्यात आले. हा प्रकार विद्यार्थ्यांना जणू डांबून ठेवल्यासारखा असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. शाळा हे एक मंदिर असुन विद्यार्थ्यांना इथे ज्ञानदान दिले जाते .पण काही वर्षांपासून शिक्षण सम्राटांनी फक्त




**गंभीर तक्रार दाखल**

पैशासाठी शाळा चालू केल्याचे या घटनेने सिद्ध होते. वास्तविक पाहता मुलांच्या फी पालकांनी भरल्याच पाहिजे .पण फी न भरली तर अशी शिक्षा करणे याचा मुलांवर गंभीर परिणाम होऊ शकतो .शाळेने पालकांना शाळेत बोलावून घेतले पाहिजे होते किंवा फोन केला पाहिजे होता .पण अशी शिक्षा म्हणजे मुलांच्या मनावर गंभीर परिणाम शाळा करतेय असे दिसून येत आहे.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास, अपमान व भीतीचा सामना करावा लागला. फी संदर्भात अडचण असल्यास पालकांना थेट बोलावणे हे योग्य व कायदेशीर असताना, विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेपासून रोखणे व तासन्तास थांबवून ठेवणे हा प्रकार अत्यंत निंदनीय, अमानवी आणि शिक्षण व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केले जात आहे. या घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधित व्यक्ती विरोधात योग्य ती चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी असे अर्जात म्हणले आहे. याबाबत एंजल हायस्कूलशी संपर्क केला असता फोन उचलण्यास असमर्थता दाखवली.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### बिरदवडी येथे सोमवारी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर




चाकण (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये व अपघातग्रस्तांना तातडीने रक्ताचा पुरवठा होऊन त्यांचे प्राण वाचले जावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेवून, बिरदवडी (ता.खेड) येथे श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे संस्थापक - अध्यक्ष स्व. देवराम धोंडीबा काळडोके यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त सोमवारी (दि.२ फेब्रुवारी) मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे माजी अध्यक्ष युवराज काळडोके यांनी दिली. स्व. देवराम काळडोके यांच्या बिरदवडी येथील निवासस्थानी सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळात चाकण येथील मदत फाउंडेशन व केअरवेल हॉस्पिटल यांच्या विशेष सौजन्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य यज्ञात सहभागी व्हा, रक्तदान करून देश कार्य आणि देव कार्यात सहभागी व्हा. अपघात ग्रस्तांसाठी रक्तदान शिबिरे ही काळाची गरज आहे, याची जाणीव ठेवून उद्योजक युवराज काळडोके मित्र परिवाराच्या वतीने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला सन्मानपत्र, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात येणार आहे. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान करण्याचे आवाहन युवराज काळडोके यांनी केले आहे.

### यवत गावची यात्रा होणार साध्या पद्धतीने

यवत (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील यवत येथील माघ शुद्ध पूर्णिमेला होणारी काळभैरवनाथाची व महालक्ष्मी मातेची होणारी वार्षिक यात्रा दिवंगत उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे साध्या पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे,अशी माहिती स्थानिक यात्रा कमिटी व समस्त ग्रामस्थ यवत यांनी एका पत्रकात माहिती दिली आहे, फक्त धार्मिक विधी पार पडणार असल्याची माहिती एका निवेदनात दिली आहे. यात्रेतील तमाशा व कुस्ती आखाडा, शोभेचा दारुगोळा रद्द करण्यात आला आहे अशी माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे. यवत गावची माघ शुद्ध पूर्णिमेला दि(1)रविवार,(2) फेब्रुवारी ला सोमवारी होणारी यात्रा श्रद्धेचा भाग म्हणून धार्मिक विधी परंपरेनुसार केले होतील असे सांगण्यात आले आहे. समस्त नागरिकांनी, व भविकांनी याची नोंद घ्यावी असे सांगितले आहे.

### मालचौंडी एन एस एस शिबीर



मेढा (दैनिक संध्या) : विवेकवाद ही संकल्पनाच मानवी जीवनाला अधिक प्रगल्भ आणि उन्नत करणारी आहे. विवेकवादामुळे माणूस निकोप आणि समतोल विचार करू लागतो. सहिष्णुता, दयाभाव, करुणा, माणसाचे दुःख जाणून घेण्याची क्षमता या सगळ्याचा विकास आपल्याला खऱ्या अर्थाने माणूस बनवतो, असे प्रतिपादन वक्ते व अभ्यासक प्रा. निरंजन फरांदे यांनी केले. जावळी तालुक्यातील मालचौंडी येथे रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरात 'विवेकवाद आणि तरुणाई' या विषयावर ते बोलत होते. प्रा. डॉ. सविता मेनकुदळे अध्यक्षस्थानी होत्या. मालचौंडीचे सरपंच संपत रवले, जावळी मित्रमेळा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रवीण पवार, एनएसएसचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नवनाथ इप्पर, प्रा. डॉ. विद्या नावडकर, प्रा. डॉ. महादेव चिंदे आदी उपस्थित होते. प्रा. फरांदे म्हणाले, "विवेकाने जगणे हा भेकडपणा नव्हे, तर ते एक धाडस आहे. जेव्हा विवेकवादी समाज निर्माण होईल तेव्हा, संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाची दारे खुली होतील." प्रा. डॉ. मेनकुदळे म्हणाल्या, "आज समाजात विवेकवादी वर्तनाची अनन्यसाधारण आवश्यकता निर्माण झाली आहे. नैतिकता, सामाजिक भान, राष्ट्रीय एकात्मता या सर्वच मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी विवेकवाद आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपण यासाठीच श्रमसंस्कार शिबिरे आयोजित करत असतो. यामुळे गाव खेड्यातील जनजीवनाची जाणीव आपल्याला होते. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण झाल्यामुळे समाजाविषयी अधिकचे जागरूकता निर्माण होते."

# माघ पौर्णिमा यात्रेनिमित्त जेजुरी गडावर भाविकांची मोठी गर्दी

**सोमवारी होणार मानाच्या शिखर काठ्यांची देवभेट : कोकणी भाविक दाखल**

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत माघ पौर्णिमा यात्रेनिमित्त लाखो भाविकांनी देवदर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात. सुमारे 50 लाखाहून अधिक भाविक दरवर्षी देवाचे दर्शन व कुलधर्म कुलाचार नुसार तळी भंडार, जागरण गोंधळ, लंगर आदी विधी करीत असतात.

माघ पौर्णिमेनिमित्त कोकणातील थेरोंडो पाचगाव व आदी भागातीलकोळी भाविक आपल्या देवाच्या पालख्या घेवून आले असून दुपारी त्यांनी वाजत गाजत पारंपरिक कोळी नृत्य करीत आपल्या पालखीची मिरवणूक काढली.यावेळी भंडारा ची उधळण करीत येळकोट येळकोट जयमल्हार मल्हारचा जयघोष केला. तसेच नाशिक, संगमनेर, मुंबई, सातारा, बारामती सुपे व राज्याच्या विविध भागातून हजारो भाविक आपल्या शिखर काठ्यांची देवभेट करण्यासाठी दाखल झाले आहेत .

तर सोमवार दिनांक 2 रोजी मानाच्या असणाऱ्या संगमनेर येथील होलम राजा शिखर काठी, सुपे येथील खैरे, होळकर मानाच्या शिखर काठ्यांची देव भेट जेजुरी गडावर होणार आहे. यासाठी संगमनेर नाशिक भागातून हजारो भाविक जेजुरीत दाखल झाले आहेत.या यात्रेत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या संख्येनं पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या माघ पौर्णिमा यात्रेनिमित्त जेजुरी गड, ऐतिहासिक चिंचेची बाग, व जेजुरी शहरातील सर्व पेठा हाऊसफुल झाल्या आहेत. जेजुरी शहरात या माघ पौर्णिमा यात्रेनिमित्त देवाचे लेण असणारा भंडार खोबरे, हार फुले,




प्रसाद, देवाचे टाक , फोटो, खेळणी तसेच आदी दुकाने थाटली असून शहरातील सर्व लॉज, निवास स्थाने, हॉटेल्स हाऊसफुल झाले आहेत.

जेजुरी गडावर, चिंचेची बाग, कडेपठार पायथा, कऱ्हा नदी येथे जागरण गोंधळ तसेच देव कार्याची रेलचेल पाहण्यास मिळाली. जेजुरी गडावर भाविकांची मोठी गर्दी असून खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने खंडोबा देवाच्या गाभाऱ्यात फुलांची आकर्षक सजावट, सुलभ दर्शन पाणी अन्नदान आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

# खंडेरायाचे दर्शन घेऊन गटातील उमेदवारांनी साधला मतदारांशी संवाद

**चाकण (दै. संध्या)**

प्रचंड टोकाचे राजकारण असलेल्या आणि खेड तालुक्यातील सर्वात श्रीमंत समजला जात असलेल्या मेदनकरवाडी - काळुस या जिल्हा परिषदेच्या गटातील प्रचार शिगेला पोहोचला आहे. माघी पौर्णिमेचे औचित्य साधून या गटातील उमेदवारांनी मेदनकरवाडी येथे तळी भंडार करून, खंडोबाचं चांगभलं, खंडेरायाचं चांगभलं, चांगभलं चांगभलं करत खंडोबाचं दर्शन घेऊन मतदारांशी घर टू घर जाऊन संवाद साधला.

चाकणलगत प्रतिजेजुरी म्हणून मेदनकरवाडी येथे खंडोबाचे मंदिर आहे. माघी पौर्णिमेनिमित्त देवाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येथे आले होते. सकाळी देवाचा अभिषेक, होमहवन, पूजा, आरती महाआरती करण्यात







आली. या यात्रेचे औचित्य साधून मेदनकरवाडी - काळुस या जिल्हा परिषद गटातील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार डॉ. दत्तात्रय खांडेभराड, ठाकरे शिवसेना गटाचे अधिकृत उमेदवार गणेश अरगडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार विनोद टोपे यांनी खंडेरायाचे दर्शन घेतले.

खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व उपसरपंच अ‍ॅड. संकेत मेदनकर, सरपंच अमोल साळवे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण मेदनकर, माजी उपसरपंच महेंद्र मेदनकर, संजय वाघमारे, संभाजी मेदनकर, डॉ. विजय मेदनकर, हेमंत भुजबळ, अमित बापू मेदनकर, गणेश भुजबळ, अरुण तोडकर, हर्षल भुजबळ आदींनी मेदनकरवाडी येथे आलेल्या भाविकांचे व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे स्वागत केले.

मेदनकरवाडी येथे दिवसभर भाविक भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. अ‍ॅड. संकेत मेदनकर, महेंद्र मेदनकर व अमित मेदनकर यांनी सांगितले की," भाविकांना दर्शनासाठी स्वतंत्र दर्शनबारी तयार करण्यात आली होती. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. परंपरेनुसार माघी पौर्णिमेच्या दरम्यान मंदिरासमोर मानाच्या गाड्याचे पूजन करण्यात आले होते. यात्रेला आलेल्या भाविकांनी भंडार खोबऱ्याची प्रचंड उधळण करत खंडेरायाचे दर्शन घेतले. अवघा परिसर भक्तीरसात चिंब झाला होता."

# आयटीआय होणार 'स्किल डेव्हलपमेंट हब': मंगलप्रभात लोढा

**बारामती (दै. संध्या)**

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या 'पीएम सेतू' योजनेमुळे राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सर्वोत्तम 'स्किल डेव्हलपमेंट हब' होणार आहेत. पहिल्या टप्प्यात राज्यातील पुण्यासह नागपूर, छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यांत ही योजना सुरू करण्यात येणार आहे," अशी माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातील 'आयटीआय'चे 'पीएम सेतू' योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार असून पुढच्या टप्प्यात उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे. 'आयटीआय'च्या आधुनिकीकरणासाठी 'हब अँड स्पोक' प्रारूप विकसित केले आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी रुपये खर्च करणार आहेत. या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असणार आहे. राज्यात एका क्लस्टरकरिता (एक हब 'आयटीआय' आणि चार स्पोक 'आयटीआय') पाच वर्षांकरिता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

# 'जनहित'च्या विद्यालयात अखंड सूर्यनमस्काराचा विक्रम

**बारामती (दै. संध्या)**

बारामती येथील जनहित प्रतिष्ठानच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त (रथसप्तमी) विद्यार्थ्यांनी तब्बल १ लाख ४८ हजार ९११ सूर्यनमस्कार घालत विक्रम नोंदविला. बालभवन ते इयत्ता नववीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी ३१ जानेवारी रोजी हा विक्रम नोंदविला.

या उपक्रमात ७४ विद्यार्थ्यांनी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत प्रत्येकी १४०१ सूर्यनमस्कार पूर्ण केले. बालभवन विभागाने सुमारे ८१९, तर प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सुमारे ९८६० सूर्यनमस्कार घालत सहभाग नोंदविला. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संचालक व पालकांनीही सूर्यनमस्कार घातले. विद्यालयाचे आचार्य हनुमंत दुधाळ यांनी ४०१ सूर्यनमस्कार घातले. जनहित प्रतिष्ठानच्या विद्यालयात पंचकोशाच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांचा दररोज सकाळी सूर्यनमस्कार, योग व उपासना यांचा सराव घेतला जातो. या नियमित सवयीमुळे जागतिक सूर्यनमस्कार दिनाच्या औचित्याने विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सूर्यनमस्कार सहज पूर्ण केले. या कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा शिक्षक सचिन नाळे, अजिंक्य साळी यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष किशोर कानिटकर, कार्याध्यक्ष समन्वयक किशोर शिवरकर, उपाध्यक्ष किरण शहा (वाडीकर), हृषीकेश घारे, सचिव सतीश गायकवाड, खजिनदार सतीश धोकटे, संचालक धनंजय क्षीरसागर, मुख्याध्यापक अतुल कुटे, बालभवन प्रमुख नीलेश भोंडवे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# हिरवी मिरची, वांगी, भोपळा व टोमॅटोची विक्रमी आवक

**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांदा, वांगी, फ्लावर, वाटाणा, हिरवी मिरची, टोमॅटो यांची भरपूर आवक झाली. लसणाचे भाव गडगडले. चाकण येथील पालेभाज्यांच्या बाजारात पालक व मेथीची आवक वाढूनही भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल ६ कोटी ६५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण ४ हजार ५०० क्विंटल आवक झाली. मागील आठवड्याच्या तुलनेत ही आवक २,००० क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव १,८०० रुपयांवरून १,६०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक ३,००० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत बटाट्याची आवक घटली. लसणाची एकूण आवक ४० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक घटली. हिरव्या




मिरचीची एकूण आवक ३२० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ६ हजार ५०० रुपयांपासून ते ७,५०० रुपयां. पर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ४,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १.१६०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - ३,००० क्विंटल, भाव क्रमांक १. १४००,. २. १,०००

फळभाज्या -

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटल मध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३४८ क्विंटल (८०० ते १,५०० रू.), कोबी - २३५ क्विंटल (८०० ते १,२०० रू.), फ्लॉवर - २२२ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), वांगी - ९२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), भेंडी - १०२ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), दोडका - ६९ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), कारली - ७२ क्विंटल ( ४,००० ते ५,००० रू.) दुधीभोपळा - ५२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), काकडी - ९७ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.),फरशी - ६२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ११० क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), ढोबळी मिरची - १६८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - ५२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वाटाणा - ५०७ क्विंटल (२,२०० ते २,७०० रू. ), गाजर - १९० क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), गवार - २६ क्विंटल ७,००० ते ९,००० रु. ), आद्रक - १९५ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु. )

# सुरेशभाऊंचा राजकीय प्रवास अजित दादांच्या माध्यमातूनच घडला - मनीषा गोरे

**चाकण (दै. संध्या)**

खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांचा राजकीय प्रवास अजित पवार यांच्या माध्यमातूनच घडला, असे प्रतिपादन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी केले.

चाकण येथे स्व.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी मनीषा गोरे बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितिन गोरे, नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश गोरे, उद्योजक विशाल नायकवाडी, नगरसेविका जयश्री नायकवाडी आदी उपस्थित होते. शोक सभेदरम्यान उपस्थित मान्यवरांनी स्व. अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. राज्याच्या विकासासाठी



घेतलेले निर्णय, सर्व सामान्यांप्रती असलेली आपुलकी आणि ठाम नेतृत्व याविषयी उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले. नगराध्यक्षा मनिषा गोरे यावेळी भावूक झाल्या होत्या. त्या म्हणाल्या, " उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची खेड आळंदी विधानसभेचे आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे हे जिल्हा परिषद सदस्य असल्यापासून आम्हांला जीवाभावाची साथ लाभली होती. सुरेशभाऊंचा राजकीय प्रवास दादांच्या माध्यमातूनच घडला होता. विधानसभेतील कामकाज करत असताना भाऊ नेहमी दादांचे मार्गदर्शन घेत असत. सुरेशभाऊंचे निधन झाल्यानंतरही अजितदादा पवार साहेबांनी 'माझा सहकारी गेला' अशी भावना व्यक्त केली होती. पवार साहेब आणि अजितदादा यांनी कायमच आम्हा गोरे कुटुंबाला सामाजिक व राजकीय मार्गदर्शन केले." अजितदादांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र राज्याची तसेच पुणे जिल्ह्याची न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. खेड तालुका, चाकण नगरपरिषद, स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार घरोघरी करणार प्रचार

**बारामती (दै. संध्या)**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक प्रचाराला सुरुवात होत असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने जिल्ह्यातील प्रचार जवळपास थांबला होता. दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी शनिवारी (ता. ३१) उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना घरोघरी जाऊन प्रचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, अजित पवार यांच्या भाषणांच्या चित्रफिती, तसेच त्यांच्या कार्याचा प्रचार विविध माध्यमांतून नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबाबत वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत निर्णय होण्याची शक्यता असल्याचे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेची निवडणुकीसाठी आता ७ फेब्रुवारीला मतदान होत आहे. प्रचारालाही अधिक वेळ मिळाला असला, तरी पुणे जिल्ह्यात इतर पक्षांनीही प्रचाराचा जोर कमीच ठेवला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर म्हणाले, "आमच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा परिस्थितीमध्ये प्रचार करणे शक्यच नव्हते. आता उमेदवार घरोघर जाऊन प्रचार करतील. त्यासह पक्षातील वरिष्ठांकडून रविवारपर्यंत पुढील प्रचार कसा करायचा, याबद्दल निर्णय सांगण्यात येणार आहे.

त्यानुसार आम्ही पुढील प्रचार करू, पण त्यामध्ये कुठलाही बडेजावपणा नसेल, मोठ्या सभा नसतील. फटाके, वाजंत्रीसह कुठलेही वाद्य वाजवले जाणार नाहीत, केवळ व्यक्तिगत गाठीभेटी आणि पत्रके वाटून मतदारांशी संपर्क साधला जाणार आहे. " दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काही ठिकाणी एकाच चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माझी नियुक्ती झाल्याबद्दलच्या बातम्या पूर्णपणे निराधार, तथ्यहीन : प्रफुल पटेल

मुंबई (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी माझी नियुक्ती झाल्याबद्दलच्या बातम्या काही प्रसारमाध्यमांमध्ये दाखवल्या जात असून या बातम्या पूर्णपणे निराधार आहेत आणि त्यात काहीही तथ्य नाही असे स्पष्टीकरण राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी 'एक्स पोस्ट' द्वारे दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा लोकशाही तत्त्वांवर चालणारा पक्ष असून पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी, आमदारांशी, पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन तसेच आमच्या सर्व पक्ष सदस्यांच्या भावना आणि सामूहिक इच्छेचा आदर करूनच याबाबतचा निर्णय घेतला जाईल असेही प्रफुल पटेल यांनी सांगितले. एक राष्ट्रीय पक्ष म्हणून, अशा बाबींमध्ये आम्ही विहित प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करतो असा स्पष्ट खुलासाही प्रफुल पटेल यांनी एक्स पोस्टमध्ये केला आहे.



### अजितदादांची दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलेली शेवटची अनोखी भेट

■ वीज दर रीस्ट्रक्चरिंगमुळे संकटात सापडलेल्या शीतकरण केंद्रांना दिलासा

भीमाशंकर (दैनिक संध्या) : शेतकरी जोडधंदा म्हणून दूध उत्पादनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. मात्र 2025 मध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विद्युत दराचे रीस्ट्रक्चरिंग केल्यामुळे गावागावातील दूध शीतकरण केंद्रांवर मोठे आर्थिक संकट ओढावले होते. दर बदलामुळे छोटे शीतकरण उद्योग इंडस्ट्रियल गटातून कमर्शियल गटात टाकण्यात आले. हा बदल मागील तारखेपासून लागू केल्याने अनेक केंद्रांना दुप्पट वीजबिलासह लाखोंच्या घरात मागील दंड आकारण्यात आला. या अन्यायकारक निर्णयाविरोधात दूध उत्पादक संघटनांनी MSEB अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी व विनवण्या केल्या, मात्र कोणताही तोडगा निघाला नाही. अखेर नामदार दिलीपरावजी वळसे पाटील यांच्या माध्यमातून संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. बैठकीत वीज दर बदलाचा परिणाम स्पष्ट करताच अजितदादांनी तत्काळ निर्णय घेत कमर्शियलमध्ये गेलेले वीज कनेक्शन पुन्हा इंडस्ट्रियल श्रेणीत वर्ग केले. हा निर्णय झाला नसता तर अनेक शीतकरण केंद्र बंद पडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असता. इतर ठिकाणी अनेक फेऱ्या मारूनही न्याय न मिळाल्याचे सांगताना संघटनांनी अजितदादांच्या एका बैठकीत प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त केले.



### विक्रोळी कन्नमवार नगरात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता सप्ताह

मुंबई (दैनिक संध्या) : विक्रोळी कन्नमवार नगरात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शनिवार दि. ३१ पासून स्वच्छता सप्ताहास सुरुवात करण्यात आली.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रभाग क्रमांक ११८ च्या नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांनी नारळ फोडून स्वच्छता सप्ताहाचा शुभारंभ केला.कन्नमवार नगरात सध्या टॉवर्स उभारली जात आहेत.विक्रोळीचे आमदार सुनीलभाऊ राऊत यांच्या माध्यमातून कन्नमवार नगराच्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम जवळ जवळ पूर्ण होत आले आहे.त्यामुळे कन्नमवार नगर खड्डेमुक्त झाले आहेत.वाढत्या लोकसंख्येमुळे व टार्वसची कामे चालू असल्यामुळेच बांधकामाच्या गाड्यांची वर्दळ आहे.त्यामुळे रस्त्यावर धुळ पसरली आहे.ही धुळमुक्त होण्यासाठी व कचरामुक्त होण्यासाठी स्थानिक नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांनी पुढाकार घेतला आहे.शिवसेना शाखा क्रमांक ११८ यांनी सुध्दा यात सहभाग घेतला आहे.याप्रसंगी शिवसेना उबाठाचे विभाग प्रमुख परम यादव,उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव,शाखाप्रमुख अभय राणे व प्रकाश पुजारे,महिला उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे,शाखा संघटिका आसावरी भोईटे,माजी महिला शाखाप्रमुख अहिल्या थोरवे आदि मान्यवरांसह शिवसैनिक उपस्थित होते.

### पीयूष गोयल यांची कबुली; प्रफुल्ल पटेल यांच्याबाबत केले होते विधान

मुंबई (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. अशातच, केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याचे विधान एका मुलाखतीत केले होते. मात्र, पीयुष गोयल यांचा हा दावा प्रफुल्ल पटेलांनी फेटाळल्यानंतर पीयूष गोयल यांनीही यावर स्पष्टीकरण दिले आहे. "एका ज्येष्ठ पत्रकाराने मला चुकीची माहिती दिली की श्री. प्रफुल्ल पटेल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. माहितीची पडताळणी न करता मी माध्यमांना काही विधाने केली, परंतु नंतर मला कळले की ती माहिती चुकीची आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. दिशाभूल करणाऱ्या माहितीबद्दल मी माफी मागतो," असे ट्विट करत पीयूष गोयल यांनी स्पष्टीकरण दिले. पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर बोलताना म्हटले होते, "एनसीपीचे नेतृत्व आता सुनेत्रा पवार यांच्याकडे असून प्रफुल्ल पटेल यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे." या विधानामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. कारण अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाचे नेतृत्व अधिकृतपणे कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# युवाशक्तीला बळ देणारा अर्थसंकल्प – डॉ. गोऱ्हे

## लेकींच्या शिक्षणाला वसतीगृहाचे बळ अन् बचत गटांना सौरऊर्जेची शक्ती; महिला सक्षमीकरणाचा नवा इतिहास

मुंबई (दै. संध्या)

■ *मुलींच्या जन्मदारात वाढ ते 'जल जीवन'ची क्रांती; हा अर्थसंकल्प महिलांच्या सन्मानाचा



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा महिला, युवा, शेतकरी आणि ग्रामीण कारागिरांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारा आहे. 'महात्मा गांधी ग्राम स्वराज योजने'पासून ते 'युवाशक्ती बजेट'पर्यंतच्या घोषणांमधून सरकारने सर्वसमावेशक विकासाचा संकल्प दिसून येतो, अशी प्रतिक्रिया विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

डॉ. गोऱ्हे यांनी या अर्थसंकल्प बाबत मांडलेले मुद्दे

वस्त्रोद्योग, हातमाग आणि हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू होणारी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना' ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरेल. महाराष्ट्राच्या दृष्टीने कापूस उत्पादनासाठी जाहीर झालेली नवीन योजना आणि नारळ, काजू तसेच चंदनाच्या परिसंस्थेसाठी केलेली तरतूद शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणारी आहे.

आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार, देशातील मुलींच्या जन्मदारात वाढ झाली आहे. 'जल जीवन मिशन'मुळे महिलांच्या वेळेची बचत होत असून आता महिला बचत गट 'छतावरील सौर ऊर्जा' आणि वीज व्यापारात सहभागी होणार आहेत, हे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे नवे पर्व आहे. प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतीगृहांची घोषणा केल्याबद्दल त्यांनी अर्थमंत्र्यांचे डॉ.गोऱ्हे यांनी विशेष आभार मानले.

धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. डॉ. गोऱ्हे यांनी विशेषतः मंदिरांच्या विकासासाठी आणि जिर्णोद्धारासाठी जाहीर केलेल्या विशेष निधीचे स्वागत केले. "मंदिरे ही आपल्या संस्कृतीचे केंद्र आहेत. त्यांच्या परिसरातील सोयी-सुविधा आणि संरक्षणासाठी दिलेला निधी भाविकांसाठी मोठा दिलासा ठरेल. तसेच २० महत्त्वपूर्ण पर्यटन स्थळांच्या मॅपिंगमुळे आणि १० हजार प्रशिक्षित गाईड्समुळे स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळेल," असे त्या म्हणाल्या.

पाच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या छोट्या आणि मध्यम शहरांच्या विकासासाठी १२.२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. "महानगरांवरील ताण कमी करण्यासाठी छोट्या शहरांमध्ये सक्षम पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा हा निर्णय दूरदृष्टीचा आहे," असे त्यांनी सांगितले.

भारताला जागतिक 'औषध निर्मिती केंद्र' बनवण्यासाठी क्लिनिकल रिसर्च आणि संशोधनावर दिलेला भर स्वागतार्ह आहे. कर्करोग आणि मधुमेहावरील औषधांच्या किमती कमी होणार असल्याने सामान्य रुग्णांना मोठा आधार मिळेल. बायो-फार्मा क्षेत्रासाठीची १०,००० कोटींची तरतूद आणि ५ प्रादेशिक मेडिकल टुरिझम हब आरोग्य क्षेत्राचा चेहरामोहरा बदलतील.

या अर्थसंकल्पाला 'युवाशक्ती बजेट' असे संबोधून डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, पूर्व भारतात नवीन 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन'ची स्थापना, पाच विद्यापीठ टाउनशिप आणि २० पर्यटन स्थळांवर १० हजार गाईड्सना दिले जाणारे प्रशिक्षण यामुळे युवकांसाठी रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होतील.

शहरी विकासासाठी १२.२ लाख कोटींची तरतूद आणि मुंबई-पुणे, पुणे-हैद्राबाद यांसारख्या सात अतिजलद रेल कॉरिडॉर्समुळे दळणवळण वेगवान होऊन उद्योगांना मोठी गती मिळेल.

"जीडीपीच्या ४.५% पेक्षा कमी वित्तीय तूट राखण्याचे वचन पूर्ण करून सरकारने आपली आर्थिक शिस्त सिद्ध केली आहे. आयुर्वेद निर्यातीला दिलेले बळ आणि आधुनिक पायाभूत सुविधांमुळे भारत २०२५-२६ मध्ये महासत्तेकडे वेगाने वाटचाल करेल," असा विश्वास डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी व्यक्त केला.

## राष्ट्रवादी विलीनीकरणावर CM फडणवीसांचा खुलासा

मुंबई (दै. संध्या)

अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. अजित पवारांनी शरद पवारांसोबत एकत्र येण्याचे ठरवले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्याचं ठरले होते. १२ फेब्रुवारीला ही घोषणा होणार होती असा दावा शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते करत आहेत. मात्र यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार गटाला फटकारले आहे. अजित पवार जर अशी चर्चा करत होते तर ती चर्चा ते एनडीएतून बाहेर पडण्यासाठी करत होते का? ते सरकारमधून बाहेर पडणार होते का? ते स्पष्टपणे सरकारमध्ये स्थिर होते. त्यामुळे रोज काहीतरी गोंधळ निर्माण करायचा आणि आपली इकोसिस्टम वापरून त्याला बळ द्यायचे हे अयोग्य आहे. मृत्यूच्या आदल्यादिवशी आम्ही १ तास गप्पा मारत होतो असं सांगत फडणवीसांनी मोठा खुलासा केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आताच्या परिस्थितीत आम्हाला राजकारण करायचे नाही नाहीतर मी अनेक गोष्टी सांगू शकतो. काय घडलं, काय घडतंय.. मी अनेक गोष्टींचा साक्षीदार आहे. माझे आणि अजितदादांचे संबंध चांगले होते. त्यात ते जवळजवळ सगळ्या गोष्टी माझ्याशी शेअर करायचे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्याच्या आदल्या दिवशी आम्ही १ तास गप्पा मारत बसलो होतो. त्यामुळे याबाबतीत खालच्या स्तराचे राजकारण करणे योग्य नाही. त्यांच्या पक्षाने निर्णय घेतला आहे.

## अजितदादा विकासाचे चालतं बोलतं विद्यापीठ : आ. अमित गोरखे

पिंपरी (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात रामकृष्ण मोरे सभागृहात शुक्रवारी (ता. ३०) सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेस शहरातील विविध सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्व पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी अजितदादांच्या आठवणी जागवल्या असता, ते जणू पुन्हा एकदा उपस्थित असल्याचा भास निर्माण झाला. भाजपाचे विधानपरिषद सदस्य आमदार अमित गोरखे यांच्या भावनिक मनोगताने सभागृह हेलावून गेले.

“अजित पवार म्हणजे विकासाचे चालते-बोलते विद्यापीठ होते,” असे नमूद करत आमदार गोरखे म्हणाले की, “विमान अपघातात निधन होण्याच्या अवघ्या एक दिवस आधी मंत्रालयात मुंबई येथे त्यांची माझी भेट झाली होती. मला आवर्जून आवाज देत ‘तब्येत सांभाळ, घराकडे लक्ष दे,’ असे आपुलकीने सांगणारे अजितदादा दुसऱ्याच दिवशी आपल्यातून निघून जातील, याची कल्पनाही नव्हती.”

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीबाबत बोलताना अजितदादांनी, ‘जर दोन महिने आधीच मैदानात उतरलो असतो, तर चित्र वेगळं असतं,’ असे स्पष्ट मत व्यक्त केल्याचा उल्लेखही आमदार गोरखेंनी केला.

अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर विरोधी पक्षनेते असलेल्या अजित पवार यांनी स्वतः भेटीस बोलावून महामंडळातील सुमारे ६०० कोटी रुपयांच्या घोटाळ्याबाबत सूचना देत काम प्रामाणिकपणे करण्याचा सल्ला दिला, सही करताना अधिकाऱ्यांसोबत अनेक वेळा चर्चा कर आणि मग सही कर असा अनुभवही त्यांनी सांगितला.

विधानपरिषदेवर निवड झाल्यानंतर अजित दादा मला ‘आमदारसाहेब’ म्हणायचे. ‘साहेब म्हणू नका,’ असे मी सांगितल्यावर ‘पदाला महत्त्व असतं,’ असे उत्तर देत त्यांनी पदाचा सन्मान जपण्याची शिकवण दिली, असा दिलदार स्वभावाचा प्रसंगही यावेळी उलगडण्यात आला.

या शोकसभेला शहरातील सर्व पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच नवचर्चित नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास महाविद्यालयात ५११ बाटल्या रक्त संकलन



मुंबई (दै. संध्या)

विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचलित विकास कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, विक्रोळी (पूर्व) येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटच्या वतीने दिवंगत कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ५११ बाटल्या रक्ताचे संकलन केले. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. विकास राऊत यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय वैद्यकीय संघटनेचे सचिव डॉ. संकेत दोशी आणि विशेष अतिथी म्हणून डॉ. हरीश पांचाळ उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून सामाजिक कार्यासाठी रक्तदानाचे महत्त्व विषद केले. शिबिरामध्ये संकलित झालेले रक्त गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी महानगर पालिकेची शताब्दी रुग्णालय रक्तपेढी आणि संकल्प रक्तपेढीसह अन्य प्रमुख रक्तपेढ्यांनी तांत्रिक सहकार्य व योगदान दिले. या उपक्रमाला स्थानिक माजी नगरसेवक श्री. उपेंद्र सावंत आणि मुंबई शिक्षक आमदार श्री. ज. मो. अभ्यंकर यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहित केले. संस्थेचे सचिव डॉ. विनय राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनघा राऊत, महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती सी. विन्स, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. संभाजी इंगळे, प्रा. विनायक मुळे आणि उपप्राचार्य प्रा. शाजी मॅथ्यू यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ माहिती केंद्र यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

## विरार-बडोदा रेल्वेमार्गावर 'कवच', संभाव्य अपघात टळणार!

मुंबई (दै. संध्या)

पश्चिम रेल्वेच्या विरार-बडोदा रेल्वे कॉरिडॉरवर गुरुवारी 'कवच' प्रणाली सुरु करण्यात आली. त्यानंतर या मार्गावरून दादर-सूर्यनगरी एक्स्प्रेस ही पहिली ट्रेन चालवण्यात आली. या माध्यमातून ट्रेनचा वेग नियंत्रणात ठेवणे, समोरून येणाऱ्या ट्रेनमधील मोटरमनशी समन्वय साधणे आणि आवश्यकतेनुसार आपसूक ब्रेक लावणे शक्य होणार आहे. पश्चिम रेलवेच्या बडोदा-सुरत-विरार विभागामध्ये कवच प्रणालीचे काम जानेवारी २०२३ मध्ये सुरू होते. ३४४ किलोमीटरच्या विभागात ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले, नागदा-बडोदा-सुरत-विरार-मुंबई सेंट्रल या मार्गावर 'कवच' प्रकल्पासाठी ३९७कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली होती. यापूर्वी डिसेंबर २०२५ मध्ये बडोदा-अहमदाबाद विभागात 'कवच' लागू करण्यात आले होते. त्यामुळे आतापर्यंत पश्चिम रेल्वेवरील एकूण ४३५ रूट किलोमीटरमध्ये 'कवच' प्रणाली कार्यरत झाली. 'कवच' ही देशात विकसित करण्यात आलेली रेल्वे सुरक्षा प्रणाली असून, त्या माध्यमातून ट्रेनचा वेग नियंत्रणात ठेवणे, समोरून येणाऱ्या ट्रेनमधील मोटरमनशी समन्वय साधणे आणि आवश्यकतेनुसार आपसूक ब्रेक लावणे शक्य होणार आहे. त्यामुळे अपघात 3 टाळण्यासाठी आणि रेल्वेच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. कमी दृश्यमानता, धुके किंवा प्रतिकूल हवामानातही ही प्रणाली इंजिनच्या केबिनमध्ये सिग्नलची माहिती पुन्हा दाखवून लोको पायलटला मदत करते. पश्चिम रेल्वेनुसार, सध्या 'कवच' डब्ल्यूएपी-७इंजिनांमध्ये सक्रिय असून एकूण ३६४ लोकोमोटिव्ह या प्रणालीने सुसज्ज करण्यात आले आहेत.

# महावितरणच्या भ्रष्टाचारी अभियंते आणि कंत्राटदारांवर कारवाई करा - कलमुर्गे

नांदेड (दै. संध्या)

■ तत्कालीन अधीक्षक अभियंता यांची खातेनिहाय चौकशीची मागणी

■ नांदेड जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बीड जिल्ह्यात बँक खाती



नायगाव मुखेड तसेच माहूर येथील अभियंते शासनाची दिशाभूल करत शासनाची फसवणूक केले असल्याचे पुराव्यासहित तक्रार मुख्य अभियंता तसेच तत्कालीन अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव यांच्याकडे अनेकवेळा करूनही कारवाई करण्यास मात्र टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले. अनेक महिने उलटले तरी चौकशी मात्र गुलदस्त्यातच असून अद्याप पर्यंत त्यांच्यावर शिस्तभंग तसेच निलंबनाची कारवाई करण्यात आली नाही, निलंबनाची कारवाई करण्यासाठी एवढा विलंब का असा सवाल माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी केले आहेत.

मुखेड, नायगाव येथील भ्रष्टाचारी अभियंते शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत अतिरिक्त बाह्य स्त्रोत कर्मचारी घेऊन त्या बोगस कर्मचाऱ्यांचे नावाने अनेक महिन्याचे पगार उचलले आहेत. अशा भ्रष्ट अभियंतावर निलंबनाची कारवाई करत शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा याबाबत गेल्या सहा ते सात महिन्यांपासून सततचा पाठपुरावा करूनही तत्कालीन अधीक्षक अभियंता हे टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले आहे. तत्कालीन अधीक्षक अभियंता यांची खातेनिहाय चौकशी करण्यात यावे आणि संबंधितांबद्दल तक्रार करूनसुद्धा कारवाई का करण्यात आले नाही याची खातेनिहाय चौकशी करून तत्कालीन अधीक्षक अभियंता जरी सेवानिवृत्त झाले असले तरीही चौकशीत दोषी आढळल्यास निवृत्तीवेतन रोखण्यात यावे, अशा प्रकारची मागणी लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी केले आहेत.

माहुर उपविभाग अंतर्गत ३३ के. व्ही. उपकेंद्र मनिरामथड येथे माहे मार्च - २०२५ मध्ये कर्मचारी हे कर्तव्यावर कार्यरत नसताना त्यांची संपर्क पोर्टलद्वारे हजेरी सादर करून त्यांची देयके उचलली, त्याचे बोगस पगार उचलणाऱ्या माहूरचे भ्रष्टाचारी सहाय्यक अभियंता राहुल शेंडे यांना त्वरित निलंबित करण्यात यावे तसेच शासनाची दिशाभूल करून फसवणूक केल्या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशा प्रकारची मागणी मुख्य अभियंता तसेच तत्कालीन अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव तसेच नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे करण्यात आले आहे.

मे. उदयगिरी स्वयंरोजगार अपरेन्ट्रीस स. संस्था ही डी. बी. केंद्रे नामक भ्रष्टाचारी महावितरण कंत्राटदाराची आहे. त्यांची ही कंपनी ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आले आहे. कर्तव्यावर कार्यरत नसताना त्यांची संपर्क पोर्टलवर खोटी हजेरी सादर करून त्यांची देयके उचलली. मणिरामथड च्या अईटवाड प्रकरण त्यांच्या कार्यकाळातला आहे.

परळीचा सचिन सावजी नामक भ्रष्टाचारी सुपरवायजर महावितरण च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बोगस पगारी उचलत असून सदरील प्रकरणाची तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बँकेचे पासबुकच्या पुरावा अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव यांना पाठवुनसुद्धा त्यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई केले नसल्याचे माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी म्हटले आहे. त्याची चौकशी करून त्यांच्यावर पण कारवाई करण्यात यावे अशा प्रकारची मागणीही करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विशेष काव्य संमेलन संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील रेडिओ एफ् टी आय आय ९०.४ एफ् एम् वाहिनीवर संविधानीक जाणीव जागृती निर्माण व्हावी यासाठी गणतंत्र, देशभक्ती तसेच या देशासाठी बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवून दिलेल्या क्रांती विरांना आदरांजली वाहण्यासाठी विशेष काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्योत्तर काळात २८ ऑगस्ट १९४७ रोजी राज्य घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धूरा सांभाळली. जगातील दहा देशांच्या राज्य घटनांचा दोन वर्षे,अकरा महिने व अठरा दिवस अभ्यास करून बारा सत्रातून विचार विनिमय व चर्चा करुन २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अमलात आले. आपल्या देशाला जगातील सर्वात मोठे लोकशाही, सार्वभौम, प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून मान्यता मिळाली., तेंव्हा पासून प्रजासत्ताक दिन हा राष्ट्रीय सण म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. विविधतेत एकता जपणारा,अनेक जाती,धर्म,पंथ असूनही लोकशाहीचा अवलंब करणारा एकमेव असा आपला देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करीत असताना येथील नागरीकांनी स्वातंत्र्याचे मोल ओळखून मातृभुमीवर शेवटपर्यंत प्रेम करावे आणि देशाच्या समृद्धी साठी वचनबद्ध रहावे अशा आशयांच्य उत्तमोत्तम कवितां या कविसंमेलनात सादर झाल्या. काव्य संमेलनात सहभागी मान्यवर साहित्यिकांमध्ये जेष्ठ साहित्यिक अशोक भगवंत वाघमारे, डॉ जयद्रथ आखाडे, शब्दस्वरा मंगळूरकर, उज्वला दहिवले कांबळे, वृषाली आढाव,मिनल साकोरे यांचा विशेष सहभाग होता.कवयित्री वृषाली आढाव यांनी सूत्रसंचालन व निवेदन करून रेडिओ एफ् टी आय आय वरील संपूर्ण टीमचे तसेच तेथील विशेष मार्गदर्शक, कार्यक्रम निर्देशिका नीता तुपारे मॅडम यांचे व सर्व साहित्यिकांचे आभार व्यक्त केले. रेडिओ एफ् टी आय आय वरील सदर कार्यक्रमात साहित्यिकांच्या बहारदार व उत्तमोत्तम कवितां मधून राष्ट्रीय एकात्मतेचे,सामर्थ्याचे,प्रगतीचे व ज्वलंत राष्ट्र भावनांचे दर्शन रसिकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले.




### अंमली पदार्थ विक्रीवर पोलिसाची कारवाई

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका चौफुला येथे रविवार दिनांक एक फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता सोलापूर पुणे सोलापूर राष्ट्रीय मार्गावरती सोलापूर ला जाणारी दिशेच्या बस थांबा एका खाजगी टपरीमध्ये नशा करणारी अमली पदार्थ बंटागोळी मोठ्या प्रमाणामध्ये सापडली आहे अशी माहिती यवत पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी दैनिक संध्या प्रतिनिधी संजय सोनवणे यांना माहिती दिली सदर या टपरीमध्ये अनेक दिवसापासून असलेली अमली पदार्थ ड्रग्स विकले जात असल्याची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली या घटनेची दखल घेऊन चौफुला या ठिकाणी यवत पोलीस स्टेशनचे नारायण देशमुख व त्यांचे सहकारी सापळा रचून अमली पदार्थ ड्रग्स विकणाऱ्या टपरी धारकावरती कायदेशीर कारवाई करून टपरीधारकावरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील या घटनेचा तपास यवत पोलीस स्टेशन करत आहे.

### कर्मवीरांच्या जन्मभूमीत रक्तदानास प्रतिसाद

बार्शी शहर (दैनिक संध्या) : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत चारे येथील कर्मवीर विद्यालयात रविवारी (ता. १) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात १२३ रक्त बाटल्यांचे संकलन करण्यात आले. या शिबिराला चारे, वालवड, पाथरी, बोरगाव, बांगरवाडी, म्हसोबावाडी, परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी, पालक, महिला, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बार्शीतील भगवंत रक्तपेढीने सहकार्य केले. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचतात. रक्तदान ही मानवतेची खरी सेवा असून समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य हनुमंत चव्हाण यांनी केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्याचा हा उपक्रम असल्याचे मत प्राचार्य चव्हाण यांनी व्यक्त केले.

### केळघर दिंडीचे प्रस्थान

केळघर (दैनिक संध्या) : केळघर येथील ओम साईनाथ मित्र मंडळाच्या वतीने केळघर ते क्षेत्र शिर्डी पालखीसह दिंडी सोहळ्याचे आयोजन मंगळवार (ता. तीन) ते शुक्रवार (ता. १३) अखेर करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र धनावडे व उपाध्यक्ष जगन्नाथ पार्टे यांनी दिली. केळघरच्या साई मंदिर येथून दिंडी सोहळ्याचे प्रस्थान झाल्यावर कुडाळ, पिंपोडे बुद्रुक, गुळुंचे, सुपा, नागरगाव, शिरूर, हंगा, राहुरी, कोल्हार येथे मुक्काम होणार आहेत. गुरुवारी (ता. १२) खंडोबा मंदिर (शिर्डी) येथे दिंडी सोहळ्याचा शेवटचा मुक्काम आहे. रविवारी (ता. १५) केळघर येथे (कै.) अण्णा बेलोशे यांच्या स्मृतीनिमित्त दत्तात्रय बेलोशे व वाघ परिवारातर्फे महाप्रसाद होईल.

### न्यु सातारा पॉलिटेक्निकचे यश

तिसंगी (दैनिक संध्या) : कोर्टी (ता. पंढरपूर) येथील न्यू सातारा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये आयोजित कबड्डी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी यश मिळविले. यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे अध्यक्ष राजाराम निकम, प्राचार्य विक्रम लोंढे, ज्ञानेश्वर शेडगे, विशाल बाड यांनी सन्मान केला. शिक्षणासोबतच त्यांच्यामधील क्रीडा व कलागुणांना प्राधान्य देऊन त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे मत प्राचार्य विक्रम लोंढे यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी स्पोर्ट कमिटी प्रमुख विश्वनाथ कुंभार, गणेश पडवळकर यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

### ओपन स्कूलमधून शिकलेल्या विद्यार्थ्यांना फार्मसी प्रवेशासाठी पात्रता

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र व राज्य सरकारच्या ओपन स्कूल शिक्षणप्रणालीतून शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना फार्मसी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरविण्याचा निर्णय भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने (पीसीआय) घेतला आहे. या निर्णयामुळे डी. फार्म, बी. फार्म आणि फार्म. डी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पीसीआयच्या कार्यकारी समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठांना देण्यात आले आहेत.

# केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा

**आमदार शंकर जगताप**

पिंपरी (दै. संध्या)



केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा विकसित भारताकडे नेणारा दमदार आणि दूरदृष्टीचा विकसित भारताचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आमदार शंकर जगताप यांनी दिली आहे. या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्रासह देशाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मलाजी सीतारामन यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. विकास, लोकांच्या वाढत्या आकांक्षा आणि 'सबका साथ, सबका विकास' या तीन सूत्रांवर आधारित हा अर्थसंकल्प आहे असे आमदार शंकर जगताप म्हणाले.

आमदार जगताप पुढे म्हणाले की, मुंबई-पुणे हायस्पीड कॉरिडॉर, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारी भांडवली खर्च १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत ठेवण्यात आली आहे. पायाभूत सुविधांवर वाढविण्यात आलेल्या गुंतवणुकीकडे लक्ष वेधत ते म्हणाले, "आजच्या गुंतवणुकीवरून सरकारचा विकासावर असलेला ठाम विश्वास स्पष्ट होतो." "महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या मोठी असल्याने, शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक, गृहनिर्माण आणि रोजगारनिर्मितीला मोठी संधी निर्माण होणार आहे," असे त्यांनी नमूद केले.

या अर्थसंकल्पात शेती, पशुपालन आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्यात आली असून शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला. तसेच महिला नेतृत्वाखालील उद्योगांना प्रोत्साहन, प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल उभारण्याचा निर्णय आणि महिला-शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद ही सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले.

> "विकसित भारताचा अर्थसंकल्प" असे यंदाच्या अर्थसंकल्पाचे एका शब्दात वर्णन करता येईल. ग्रामीण भागाला बूस्टर, महानगरांना नियोजन देणारा, दीर्घकालीन विकासाला चालना आणि देशाचे आर्थिक स्थैर्य मजबूत करणारा हा अर्थसंकल्प आहे. महत्त्वाचे म्हणजे पुणे मुंबई हायस्पीड कॉरिडॉरच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याची गुंतवणूक, औद्योगिक विकास, शैक्षणिक, दळणवळण आणि आरोग्य क्षेत्राचा ग्राफ उंचावणार आहे. एकंदरीतच देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नांकडे झेपावणारा हा अर्थसंकल्प आहे. ज्यामध्ये महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नियोजनाचे प्रतिबिंब स्पष्टरित्या दिसत आहेत. अर्थसंकल्पातून देशातील सामान्य नागरिकांचा आर्थिक भार कमी होईल आणि आर्थिक स्थैर्य मजबूत बनेल, असा विश्वास आहे. महाराष्ट्रासहित विविध राज्यांना देखील बळकट आर्थिक महत्त्व देणारा हा पुढील 50 वर्षांच्या विकासाचे रोडमॅप दर्शविणारा अर्थसंकल्प आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड शहर**

डिजिटल अर्थव्यवस्थेबाबत बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले की, डेटा सेंटर उभारणाऱ्या कंपन्यांना २०४७ पर्यंत करसवलत देण्याचा निर्णय हा भारताला डिजिटल हब बनवण्याच्या दिशेने निर्णायक ठरेल. यामुळे परदेशी गुंतवणूक वाढेल, क्लाऊड, AI आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल.

सीमाशुल्कात सवलत देत १७ कर्करोगविरोधी औषधे आणि ७ इतर दुर्मिळ आजारांच्या औषधांना मूलभूत सीमाशुल्कातून सूट देण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. 'लखपती दिदी' योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करण्याची योजना अर्थसंकल्पातील एक महत्त्वाची बाब असून, प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना देखील तयार करण्यात आली आहे. रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा, गुंतवणूक आणि इन्फ्रास्ट्रक्चरला दिलेले प्राधान्य देशाला तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे वेगाने घेऊन जाईल," असेही त्यांनी स्पष्ट केले.एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणारा आणि महाराष्ट्रासह देशाच्या दीर्घकालीन प्रगतीचा मजबूत पाया घालणारा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

## कुस्ती मैदानात पैलवान धनाजी कोळी प्रथम क्रमांकाचा विजेता

विंग/कोळे, दै. संध्या)

श्री संत घाडगेनाथ महाराज वार्षिक यात्रेनिमित्त कोळे (ता. कऱ्हाड) येथे झालेल्या कुस्ती मैदानात पुण्याच्या हनुमान आखाड्याचा पैलवान धनाजी कोळीने सांगलीच्या भोसले व्यायाम शाळेचा पैलवान प्रशांत शिंदेवर अखेरच्या क्षणी गुणावर मात केली. डाव- प्रतिडावाने दोन्ही मल्लांची दमछाक झाली. २५ मिनिटं कुस्ती रंगली. अखेरच्या क्षणी गुणावर धनाजी कोळी भारी ठरला. प्रथम क्रमांकाचे ७५ हजार रुपयांचे रोख बक्षीस आणि घाडगेनाथ केसरी किताब व मानाची गदा पटकावली. मैदानात लहान-मोठ्या ५० हून अधिक चटकदार कुस्त्या झाल्या. विभागातील स्थानिक मल्लांनी नेत्रदीपक यश मिळवले. श्री संत घाडगेनाथ महाराज वार्षिक यात्रेत मोरया कला क्रीडा मंडळ, शंभू फॅन क्लब व ग्रामस्थांच्या विशेष सहकार्यातून कुस्त्यांचे सलग तिसऱ्या वर्षी मैदान यशस्वीपणे पार पडले. कुस्ती शौकिनांनी हजेरी लावली. द्वितीय क्रमांकाच्या कुस्तीत सांगलीच्या हांडे-पाटील तालमीच्या पृथ्वीराज पवारने कोल्हापूर शाहूपुरी तालमीच्या विकी थोरातला पोकळ घिस्सा डावावर अवघ्या सातव्या मिनिटात अस्मान दाखवले. तृतीय क्रमांकासाठी कऱ्हाड छत्रपती आखाड्याचा पैलवान साहिल पोळने पुण्याच्या हनुमान आखाड्याचा पैलवान माऊली मारकडवर गुणावर विजय नोंदवला. कडेगावचा पैलवान शुभम पवारने रेठरे खुर्दच्या पैलवान शिवराज मोहितेवर गुणाने मात केली. यासह कुसूरच्या इंद्रजित शिंदेने इचलकरंजीच्या सौरभ पाटीलला एकछाक डावावर चितपट केले.

## चाकण भागात रणरणत्या उन्हात उमेदवारांचा प्रचार

चाकण (दै. संध्या)

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी मोजकेच काही दिवस बाकी राहिल्याने चाकण भागातील उमेदवारांनी रणरणत्या उन्हात प्रचार सुरू ठेवल्याने दिवसेंदिवस प्रचाराची रंगत वाढत चालली आहे.

डोक्यात भगवी टोपी, गळ्यात भगवा गमजा, पांढरे शुभ्र कपडे परिधान केलेले डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांच्यासारखे दमदार आणि कर्तबगार उमेदवार चाकण भागातील मेदनकरवाडी, काळुस, रासे, कडाचीवाडी, वाकी गावांमध्ये घर टू घर जाऊन मतदारांशी संवाद साधत आहेत. ग्रामीण भागात भाकरीचा चंद्र शोधणाऱ्या नागरिकांना शासनाकडून मिळणाऱ्या सेवा सवलती मिळत नाहीत. प्रत्येक सेवेपासून सर्वसामान्य नागरिक वंचित राहत आहेत. अशा नागरिकांना सवलती मिळाल्या पाहिजेत. जो दुसऱ्याचं भलं इच्छितो त्यांचं देवही भलं करतो. हे ब्रिद सत्यात उतरवण्यासाठी व गरिबांना दिलासा देण्यासाठी डॉ. दत्तात्रय खांडेभराड हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.




कडाचीवाडीच्या उपसरपंच रूपालीताई खांडेभराड यांनी महिलांना बरोबर घेऊन डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांच्यासाठी घर टू घर पिंजून काढून प्रचाराची राळ उडवून दिली आहे. या भागात पायाभूत सुविधा कोलमडलेल्या आहेत. रस्ते, पाणी, वीज यांची वानवा आहे. जनावरांना चालताना लाज वाटेल, असे रस्ते झाले आहेत. विकासाच्या नावाखाली विविध प्रकल्पांचा दट्ट्या खेड तालुक्याच्या वाट्याला येत असताना स्थानिक भूमिपुत्र आज रोजगारांपासून वंचित राहिला आहे. याची जाणीव ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

रणरणत्या उन्हात प्रचार सुरू असल्याने मतदारांची करमणूक वाढली आहे. सुज्ञ मतदार राजहंसाप्रमाणे दूध आणि पाणी वेगळे करून माझ्यासारख्या कर्तबगार उमेदवाराला शंभर टक्के न्याय देतील, असा विश्वास डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी व्यक्त केला आहे.

## अनिवासी भारतीयांच्या व भारतातील रीटेल क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते : डॉ. धनंजय दातार

पुणे (दै. संध्या)

भारतीय अर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षातच जगातील तिसरी मोठी अर्थसत्ता बनू शकेल. तशा संधीही आपल्याला चालून आल्या आहेत. ब्रिटन, न्यूझिलंड संयुक्त अरब अमिरात, युरोपीय महासंघ यांच्याशी झालेल्या व्यापारी करारांमुळे निर्यातवाढीत मोठी झेप अपेक्षित आहे. मात्र त्याचवेळी अनिवासी भारतीयांकडून भारतात गुंतवणुकीला प्रोत्साहनाबाबत, तसेच भारतातील रीटेल क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते, अशी अपेक्षा दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष व मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी बोलून दाखवली आहे.



आज जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत करताना ते म्हणाले, "भारतीय अर्थव्यवस्थेला प्रचंड ताकद देण्याचे सुप्त सामर्थ्य रीटेल क्षेत्रात आहे, परंतु भारतात एकतर या क्षेत्रात खूप कमी व्यावसायिक आहेत आणि जे आहेत ते उच्च करांच्या दडपणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सक्षमतेने स्पर्धा करु शकत नाहीत. त्यावर उपाय म्हणून सरकारने हे व्यावसायिक व सर्वसामान्यांवरील करांचे ओझे कमी करावे आणि अनिवासी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतातील रीटेल क्षेत्रात थेट गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन द्यावे."

ते पुढे म्हणाले, "भारतातील प्रचंड लोकसंख्येच्या तुलनेत तसेच रीटेल बाजारपेठही प्रचंड उलाढालीची असताना या क्षेत्रात व्यावसायिकांची संख्या अद्यापही पुरेशी नाही. त्यामुळे भारतीय परदेशात जाऊन व्यवसाय करतात पण देशात मात्र मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत नाही परदेशांच्या तुलनेत स्थानिक वेतनमानही आकर्षक नसते. यावर उपाय म्हणून सरकारने अनिवासी भारतीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतीय रीटेल क्षेत्रात आकर्षित करुन कर सवलती दिल्यास तसेच परकी थेट गुंतवणुकीस (एफडीआय) प्रोत्साहन दिल्यास येथे नव्या नोकऱ्या आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, कर्मचाऱ्यांना चांगले वेतनही मिळेल आणि व्यावसायिकांची संख्या वाढल्यास स्पर्धात्मकतेमुळे वस्तूंच्या किंमती कमी होऊन सर्वसामान्यांना वस्तू स्वस्तात मिळतील. अनेक अनिवासी भारतीय जगभरात उत्तम व्यवसाय करतात, पण भारतात गुंतवणुकीस राजी होत नाहीत. हे चित्र बदलणे गरजेचे आहे." भारतातील रीटेल क्षेत्रात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि आगामी काळ भारतासाठी अत्यंत आश्वासक आहे, असे स्पष्ट करताना डॉ. दातार म्हणाले, की काही वर्षांपूर्वी भारत खरेदीदारांची बाजारपेठ (बायर्स मार्केट) होता तो आज विक्रेत्यांची बाजारपेठ (सेलर्स मार्केट) बनला आहे.

## टीईटीचा अंतिम निकाल ३ फेब्रुवारीला; उत्तीर्णतेचा टक्का वाढणार

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटीचा अंतरिम निकाल उमेदवारांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. परंतु, अंतिम निकाल केव्हा लागणार? याबाबत उमेदवारांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता हा निकाल मंगळवारी 3 फेबुवारीला जाहीर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर यंदा निकालाचा टक्का देखील वाढणार असल्याची माहिती राज्य परीक्षा परिषदेतील सूत्रांनी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे 23 नोव्हेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या टीईटीला प्रविष्ट होणाऱ्या उमेदवारांची संख्या चांगलीच वाढली. या परीक्षेसाठी राज्यभरातील 4 लाख 75 हजार 668 उमेदवारांनी नोंदणी केली होती. राज्यातील 1420 परीक्षा केंद्रांवर या उमेदवारांची परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर परीक्षेची उत्तरसूची जाहीर केली, नंतर उमेदवारांना त्यांच्या लॉगिनमध्ये अंतरिम निकाल पाहण्यास उपलब्ध करून दिला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा परीक्षेच्या निकालात सुमारे दहा टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दरम्यान, सीटीईटी परीक्षा जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रशिक्षणाच्या दिवशी येत असल्याने सीटीईटी परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी केली जात आहे. तर, सीटीईटीपूर्वी टीईटीचा निकाल जाहीर करावा, अशी अपेक्षा उमेदवारांकडून व्यक्त केली जात आहे. त्यानुसार परीक्षा परिषदेने टीईटीच्या अंतिम निकालाची तयारी पूर्ण केली आहे. प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न चुकल्यामुळे संबंधित प्रश्नांचा गुण वजा करून उमेदवारांचा निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे निकाल जाहीर करण्याच्या गुणोत्तरात बदल होणार आहे.

# भाविकांच्या भक्तीनामघोषाने मेदनकरवाडी दुमदुमली

**लाखो भाविकांनी घेतले खंडेरायाचे दर्शन**

चाकण (दै. संध्या)



खंडोबाचं चांगभलं, खंडेरायाचं चांगभलं, चांगभलं चांगभलं करत लाखो भाविकांनी माघी पौर्णिमेनिमित्त चाकणलगतच्या मेदनकरवाडी येथे मोठ्या भक्ती भावाने खंडोबाचं दर्शन घेतले. अवघा परिसर भक्ती रसाने चिंब झाल्याने अवघी मेदनकरवाडी दुमदुमली होती.

चाकणलगत प्रतिजेजुरी म्हणून मेदनकरवाडी येथे खंडोबाचे मंदिर आहे. माघी पौर्णिमेनिमित्त देवाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येथे आले होते. सकाळी देवाचा अभिषेक, होमहवन, पूजा, आरती महाआरती करण्यात आली. दिवसभर सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती. खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व उपसरपंच ॲड. संकेत मेदनकर, सरपंच अमोल साळवे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण मेदनकर, माजी उपसरपंच महेंद्र मेदनकर, बाळासाहेब मेदनकर, शिवाजी मेदनकर, संजय वाघमारे, संभाजी मेदनकर, डॉ. विजय मेदनकर, हेमंत भुजबळ, अमित बापू मेदनकर, गणेश भुजबळ, राहुल मेदनकर, अरुण तोडकर, हर्षल भुजबळ आदींनी यात्रेचे उत्कृष्ट नियोजन करून दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे स्वागत केले.

मेदनकरवाडी येथे दिवसभर भाविक भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. विक्रेत्यांनी खेळणीच्या वस्तूंची दुकाने थाटली होती. अवघा परिसर गजबजून गेला होता. यात्रेकरूंनी यात्रेचा मनमुराद आनंद लुटला. सरपंच अमोल साळवे, महेंद्र मेदनकर, हेमंत भुजबळ व अमितबापू मेदनकर यांनी आभार मानले.

> "भाविकांना दर्शनासाठी स्वतंत्र दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. परंपरेनुसार माघी पौर्णिमेच्या दरम्यान मंदिरासमोर मानाच्या गाड्याचे पूजन करण्यात आले होते. यात्रेला आलेल्या भाविकांनी भंडार खोबऱ्याची प्रचंड उधळण करत खंडेरायाचे दर्शन घेतले. अवघा परिसर भक्तीरसात चिंब झाला होता. मोठ्या उत्साहात आणि धुमधडाक्यात यात्रा निर्विघ्नपणे पार पडली."
>
> **- ॲड. संकेतभाऊ मेदनकर, उपसरपंच, मेदनकरवाडी**